बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

आपला महाराष्ट्र
मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२९६ ■ बुधवार २९ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४
POST REGD.NO./DHL/53/24-26

।। श्री गणेशाय नमः ।।
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.

१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

# नीट पेपरफुटी वरून लोकसभेत रणकंदन
# पंचेचाळीस पैकी चौरेचाळीसांना जामीन-काँग्रेस

**नवी दिल्ली, दि. २८ (प्रतिनिधी) : नीट आणि इतर स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने लोकसभेत मांडलेल्या सार्वजनिक परीक्षा (अनुचित प्रकारास प्रतिबंध) दुरुस्ती विधेयक -२०२६ वरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार चर्चा झाली. विरोधकांनी सरकार पेपरफुटी रोखण्यात अपयशी ठरल्याचा आरोप केला. केंद्र सरकारने परीक्षा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी प्रभावी उपाययोजना केल्याचे सांगितले. काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी विधेयकावरील चर्चेदरम्यान सरकारवर टीका करताना नीट पेपरफुटी प्रकरणातील कारवाईवर प्रश्न उपस्थित केले. यापुर्वी २०२४ मधील पेपरफुटी प्रकरणातील ४५ आरोपींपैकी ४४ जणांना जामीन मिळाल्याचा दावा त्यांनी केला.**



संसदेत गोगोई यांनी आरोप केला की, सरकारने पेपरफुटी प्रकरणातील मुळ दोषींवर कठोर कारवाई करण्याऐवजी काही कर्मचाऱ्यांवरच कारवाई केली आहे. या प्रकरणात निलंबित किंवा बदली करण्यात आलेल्या सत्तेचाळीस जणांची माहिती सरकारने स्पष्ट करावी, अशी मागणी त्यांनी केली. पेपरफुटी प्रकरणातील कथित मुख्य सूत्रधाराला अटक होऊनही जामीन मिळाल्याचा उल्लेख करत गोगोई यांनी सरकारच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

विरोधकांच्या आरोपांना उत्तर देताना केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी सरकारची परीक्षा सुधारणांबाबतची भूमिका स्पष्ट केली. परीक्षा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या राधाकृष्णन समितीच्या चाळीस पैकी पस्तीस शिफारशी लागू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. हे दुरुस्ती विधेयक देशातील तरुणांच्या हितासाठी आणि परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी आणण्यात आले असल्याचे जितेंद्र सिंह यांनी नमूद केले. दरम्यान, लोकसभेत या विधेयकावर विस्तृत चर्चा घेण्यात आली. सुरुवातीला सहा तासांची चर्चा निश्चित करण्यात आली होती. मात्र, विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन चर्चेचा कालावधी आठ तासांपर्यंत वाढविण्यात आला. गरज भासल्यास आणखी वेळ देण्याची तयारी असल्याचे संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी स्पष्ट केले.

## नागपूरात पावसामुळे मुले शाळेत अडकले

नागपूर, दि. २८ (प्रतिनिधी) : नागपूर शहरात मंगळवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले. सोमलवार निकालस आणि सोमलवार खामला या शाळांच्या परिसरात तीन ते चार फूट उंचीचे पाणी साचल्याने सुमारे ८०० विद्यार्थी अडकले होते. अग्निशमन दल, पालक आणि स्थानिक नागरिकांच्या तत्परतेमुळे सर्व विद्यार्थ्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. दरम्यान, जोरदार पावसामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उद्या (दि.२९) शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

मुसळधार पावसामुळे शाळेच्या मैदानासह परिसरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते. पाण्याचा प्रवाह वाढल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. परिस्थिती लक्षात (पान ४ वर)

# महाराष्ट्रासह सात राज्यांना सुप्रीमचे आदेश
# गुन्हेगारी नसलेल्या आंदोलकांना सोडा

**नवी दिल्ली, दि. २८ : कॉकरोच जनता पार्टीच्या विद्यार्थी आंदोलन दरम्यान अटक किंवा ताब्यात घेण्यात आलेल्या आंदोलकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने आज महाराष्ट्रासह सात राज्यांना महत्त्वाचे निर्देश दिले. गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या तसेच अल्पवयीन विद्यार्थी आंदोलकांची तातडीने सुटका करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. नीट पेपरफुटीसह विविध परीक्षांतील कथित अनियमिततेविरोधात झालेल्या आंदोलन दरम्यान पोलिसांनी अतिबळाचा वापर केल्याचा आरोप करणाऱ्या याचिकांवर सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. आंदोलनात सहभागी झाल्यामुळेच अटक केलेल्या किंवा ताब्यात घेण्यात आलेल्या आणि ज्यांची कोणतीही**



**गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही, अशा विद्यार्थ्यांची सुटका करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाचे आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अटकेत असलेल्या विद्यार्थ्यांची सुटका करण्याची सुचना केली आहे.**

खंडपीठाने स्पष्ट केले की, आंदोलनात सहभागी झाल्यामुळेच अटक किंवा ताब्यात घेण्यात आलेल्या आणि ज्यांची कोणतीही गुन्हेगारी नोंद नाही, अशा सर्व विद्यार्थ्यांची सुटका करण्यात यावी. अशा विद्यार्थ्यांविरोधात कोणतीही सक्त किंवा कठोर कारवाई करू नये, असेही न्यायालयाने सांगितले. या प्रकरणाशी संबंधित सर्व सीसीटीव्ही फुटेज, ड्रोन चित्रीकरण, बॉडी कॅमेऱ्यांचे व्हिडिओ, वायरलेस संभाषणाच्या नोंदी आणि पीसीआर लॉग सुरक्षित ठेवण्याचे आदेश न्यायालयाने संबंधित यंत्रणांना दिले. विद्यार्थी आंदोलकांची वैयक्तिक माहिती आणि डिजिटल डेटा गोपनीय ठेवावा. चौकशी पूर्ण होईपर्यंत ही माहिती सार्वजनिक करू नये, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

**स्वतंत्र चौकशीची शक्यता**

न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, (पान ४ वर)



# डॉ.गावीत कुटुंबियांवरील वक्तव्याच्या निषेधार्थ; साक्रीत भाजपचा मोर्चा

**साक्री, दि.२८(प्रतिनिधी)- महाराष्ट्राचे माजी आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित तसेच माजी खासदार डॉ. हिना गावित यांच्याविरोधात सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या कथित आक्षेपार्ह ऑडिओ क्लिपप्रकरणी साक्री येथील भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी साक्री पोलीस ठाण्या वर मोर्चा काढत लेखी तक्रार दाखल केली. संबंधितांवर तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली .**

तक्रारीनुसार, सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका ऑडिओ क्लिपमध्ये माजी महामंत्री विजय चौधरी यांनी डॉ. विजयकुमार गावित यांच्यावर खोटे आरोप करत त्यांच्याबाबत तसेच माजी खासदार डॉ. हिना गावित यांच्याविषयी कथितरित्या अश्लील व शिवीगाळयुक्त वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे आदिवासी समाजाच्या भावना दुखावल्या असून जिल्ह्यात संतापाचे वातावरण निर्माण झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

डॉ. हिना गावित या आदिवासी समाजातील ज्येष्ठ महिला नेत्या असून त्यांच्याविषयी करण्यात आलेले कथित आक्षेपार्ह वक्तव्य हे महिलांचा तसेच लोकप्रतिनिधींचा (पान ४ वर)

## शेतकऱ्याचे पन्नास हजार लुटले; एकाला अटक

धुळे, दि.२८- बँकेतून पैसे काढून शेताकडे निघालेल्या शेतकऱ्याला चाकूचा धाक दाखवून पन्नास हजार रुपये लुटल्याची घटना डोमकानी (ता. साक्री) शिवारात घडली.

निजामपूर पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाला. एकाला अटक करण्यात आली.

वासखेडी (ता. साक्री) येथील जितेंद्र रामदास दहिते यांचे वडील रामदास सोनू दहिते सोमवारी (ता.२७) दुपारी बाराच्या सुमारास बँकेतून सेवानिवृत्तीचे पन्नास हजार रुपये काढून कापडी पिशवीत ठेवले. ते पायी शेतातील घरी जात होते. मोटार सायकलवर स्वार किरीश शिकंदर सिसोदिया (१८), (पान ४ वर)

# शेतकऱ्यांनी आधार बायोमेट्रिक प्रमाणीकरण करून कर्जमाफीचा लाभ घ्यावा- मनोज चौधरी

**धुळे, दि.२८- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत धुळे जिल्ह्यातील धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., धुळे तसेच राष्ट्रीयीकृत बँकांच्या पात्र शेतकऱ्यांची यादी संबंधित बँकांच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध झाली आहे. पात्र शेतकऱ्यांनी आपले नाव व कर्जमाफीची रक्कम संबंधित बँक शाखेत जाऊन तपासून करुन आपले आधार प्रमाणीकरण करावे, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक मनोज चौधरी यांनी केले आहे.**

योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्रीस्टॅक फार्मर आयडी अनिवार्य आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप ग्रीस्टॅक नोंदणी केलेली नाही, त्यांनी तात्काळ जवळच्या आपले सरकार सेवा केंद्र किंवा सीएससी केंद्रावर जाऊन नोंदणी करून घ्यावी.

तसेच कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्र, सीएससी केंद्र किंवा संबंधित बँक शाखेत जाऊन आधार बायोमेट्रिक (अंगठा) प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया जिल्ह्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्र, सीएससी केंद्र आणि संबंधित बँक शाखांमध्ये उपलब्ध असून ती पूर्णपणे विनामूल्य आहे. आधार प्रमाणीकरणासाठी कोणत्याही केंद्रावर कोणतेही शुल्क देऊ नये, असेही आवाहन करण्यात आले आहे.

धुळे जिल्ह्यात पहिल्या यादीत एकूण २९ हजार १२ शेतकरी कर्जमुक्तीसाठी पात्र आहेत. त्यापैकी आजअखेर ४ हजार २७९ शेतकऱ्यांनी आधार बायोमेट्रिक प्रमाणीकरण पूर्ण केले असून २४ हजार ७३३ शेतकऱ्यांनी अद्याप ही प्रक्रिया केलेली नाही. पात्र शेतकऱ्यांनी तातडीने आधार बायोमेट्रिक (पान ४ वर)

## मोगलाईत महिलेसह मुलाचे दागिने हिसकावले

धुळे, दि.२८- येथील साक्री रोड मोगलाई परिसरात रस्त्यात अडवणूक करीत दोन संशयीतांनी महिलेसह मुलाचे दागिने हिसकावून नेले.

सतीश नाना लोंढे (३५) रा. मोगलाई आईसोबत जात होते. त्यांच्या गळ्यातील ११ ग्रॅम सोन्याची चैन, आईच्या गळ्यातील १० ग्रॅम सोन्याची साखळी जबरदस्तीने हिसकावून नेली. रविवारी (ता.२६) रात्री साडेदहाच्या सुमारास घटना घडली. या प्रकरणी किसन झिपरू बागुल, आम्रपाली भगवान बागुल (दोघे रा. साक्री रोड) यांच्याविरुद्ध धुळे शहर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाला. या प्रकरणाची कसोशिने चौकशी व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## पांडव नगरात घरफोडी दागिने, रोकड लंपास

धुळे, दि.२८- तालुक्यातील मोराणे (प्र. ल.) येथील पांडव नगर परिसरात अज्ञात चोरट्याने बंद घराचे कुलूप तोडून सुमारे पन्नास ते साठ हजारांची रोकड तसेच सोन्या-चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. या चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पांडव नगरातील रहिवासी विवेक सतीश सोनार हे कुटुंबासह गेल्या आठ दिवसांपासून बाहेरगावी गेले होते. घर बंद असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने मुख्य दरवाजाचे कुलूप तोडत घरात प्रवेश केला. (पान ४ वर)

# छत्रपती शिवाजी महाराज स्मारक उभारणीबद्दल आ.अग्रवालांचा सकल मराठा समाजातर्फे सत्कार

**धुळे,दि.२८-धुळेशहरातील मनोहर टॉकीज समोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य स्मारक उभारणीसाठी झालेल्या महत्वपूर्ण प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर धुळे शहराचे आ. अनुप अग्रवाल यांचा सकल मराठा समाज, धुळे जिल्हा यांच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला.**

यापूर्वी दि.२४ जुलै २०२६ रोजी दुपारी ४ वाजता मनोहर टॉकीज समोर शिवस्मारकाची स्थापना करण्यात आली होती. या स्मारकाच्या उभारणीसाठी आ. अग्रवाल यांनी दिलेल्या



योगदानाची दखल घेत समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आमदार संपर्क कार्यालया समोरील शिवस्मारक परिसरात हा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला.

यावेळी आ.अनुप अग्रवाल यांनी देखील आपले मत व्यक्त करतांना (पान ४ वर)

## शिरपुरात धूम स्टाईलने चेन स्नॅचिंग

शिरपूर दि.२८ (का.प्र.) : शहरातील हिरा नगर भागात पादचारी महिलेच्या गळ्यातील मंगलपोत खेचून चोरट्यांनी मोटारसायकलवर धूम ठोकली. ही घटना २४ जुलैला शहरातील हिरा नगर येथे घडली. मीना कैलास अग्रवाल (वय ६१ वर्ष, रा.हिरा नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्या घराजवळ विजय पाटील यांच्या घरासमोरुन पायी जात असताना काळ्या रंगाच्या बुलेटवर आलेल्या दोघांनी त्यांच्याजवळ थांबून गळ्यातील आठ ग्रॅमची व १६ हजार रुपये किंमत असलेली मंगलपोत खेचून घेत पळ काढला. त्यांच्या फिर्यादीवरुन शहर पोलिस ठाण्यात अज्ञात संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. उपनिरीक्षक जितेंद्र महाजन तपास करीत आहेत.

# उत्तर महाराष्ट्र उद्योग-व्यापार संवाद व उद्योजक मेळावा उत्साहात संपन्न



**धुळे, दि.२८- मालेगाव रोड मुंबई महामार्गावरील एका हॉटेलमध्ये महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरच्या संकल्पनेतील गाव तिथे उद्योजक उपक्रमांतर्गत उत्तर महाराष्ट्र उद्योग-व्यापार संवाद व उद्योजक मेळावा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रवींद्र माणगावे यांनी भुषवले तर मुख्य अतिथी म्हणून आमदार, माजी कॅबिनेट मंत्री अमरीशभाई पटेल उपस्थित होते.**

या मेळाव्यात उत्तर महाराष्ट्रासाठी पुढील दहा वर्षे : सुवर्णकाळ या विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आ.मंजुळा गावित, माजी जि.प.अध्यक्ष सुभाष देवरे, ट्रस्ट बोर्डचे चेअरमन आशिष पेडणेकर, वरीष्ठ उपाध्यक्ष करूणाकर एस.शेट्टी, संतोष मंडलेचा यांच्यासह कैलाशचंद्र बी अग्रवाल उपस्थित होते. या भव्य कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे उपाध्यक्ष महेंद्र(कैलाश)अग्रवाल यांनी केले.



# विजय चौधरी यांच्या वक्तव्याचा निषेध कारवाईची आदिवासी समाजाची मागणी

**नंदुरबार, दि.२८ (प्रतिनिधी)- भाजपाचे नेते विजय चौधरी यांनी आदिवासी सामाजिक कार्यकर्त्या मालती वळवी यांच्याबाबत आक्षेपार्ह व अपमानास्पद वक्तव्य केल्याचा आरोप करत आदिवासी समाजातील महिला व पुरुषांनी त्यांच्या विरोधात तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या प्रकरणी विजय चौधरी यांच्यावर कायदेशीररीत्या कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.**

२८ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विशेष पोलीस महानिरीक्षक (नाशिक) तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक, नंदुरबार यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात मालती वळवी यांच्याबाबत करण्यात आलेले कथित वक्तव्य हे आदिवासी समाजाच्या भावना दुखावणारे असल्याचा आरोप करण्यात आला असून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून विजय चौधरी यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर कविता वाघ, कविता कोकणी, आशा वळवी, अजित जगताप, सागर पावरा, कुंदनमाला पावरा, यश वाघ, शीतल वळवी, मनीषा पावरा , कुणाल कुमार, , भारतसिंग, विशाल अहिरे, कविता कोकणी , अमोल गोरे ,, प्रतिभा वसावे, अनिता वळवी, विलास पावरा, अजित जगताप आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,31,000 रु.+3% GST
सोने- 24 K -1,43,000 रु.+3% GST
चांदी- 2,23,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# तीन हजार नऊशे चार किलो गांजा प्रकरणातील संशयीत आरोपी मांगीलाल पावरांची निर्दोष मुक्तता

**धुळे, दि.२८- शिरपूर तालुक्यातील लाकड्या हनुमान गावात तीन हजार नऊश चार किलो गांजा बाळगल्या प्रकरणी मे.न्यायालयात कामकाज झाले. मा.न्यायालयाने आरोपी मांगीलाल बारकु पावरा यांची निर्दोष मुक्तता केली आहे. आरोपीतर्फे ॲड. मोहन एस. भंडारी यांनी काम पाहिले तर त्यांना ॲड. चैतन्य एम. भंडारी, ॲड. चार्मिश एम. भंडारी, ॲड. प्राजक्ता राणा, ॲड. पूजा प्रजापत, ॲड. प्रशांत वाघ यांनी सहाय केले.**

याबाबत सविस्तर माहिती अशी की, दि. १६/०६/२०२० रोजी सकाळी ९.३० वाजता स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा कार्यालयात पोलिस निरिक्षक शिवाजी बुधवंत यांना गुप्त बातमी मिळाली की शिरपूर तालुक्यातील लाकडया हनुमान गावात मांगीलाल बारकू पावरा याच्या शेतात बांधकाम सुरु असलेल्या घराच्या बाजूला चाऱ्याच्या पेंडयाखाली मानवी मेंदूवर विपरित परिणाम करणारा गांजा मादक पदार्थाची विक्री करण्याच्या उद्देशाने साठवणूक केली आहे अशी बातमी मिळाल्याचे सांगितले. त्यानंतर मा. पोलिस अधिक्षक यांना अवगत करुन कार्यवाहीची परवानगी मागितली त्यानंतर दोन सरकारी पंच राजेंद्र श्रावण सुर्यवंशी, वरीष्ठ लिपीक पोलिस अधिक्षक कार्यालय, आत्माराम संभू वाघ कनिष्ठ लिपीक पोलिस अधिक्षक कार्यालय (पान ४ वर)

## बेटावदला आयडीया कं.चे नेटवर्क मिळत नाही

बेटावद, दि.२८- शिंदखेडा तालुक्यातील बेटावद व परिसरातील गावांमध्ये आयडिया नेटवर्क गेल्या काही महिन्यांपासून वारंवार बंद चालू होत असल्याने ग्राहकांमध्ये मोठ्या प्रमाणात अडचणीच्या सामना करावा लागत आहे.

या अनेक ठिकाणी मोबाईलला नेटवर्क मिळत नसल्यामुळे कॉल लागत नाहीत तसेच इंटरनेट सेवा ही पूर्णपणे मिळत नसल्यामुळे ग्राहकांची नाराजी दिसून येत आहे तसेच या नेटवर्क समस्येमुळे ऑनलाइन व्यवहार तसेच शेतकरी व्यापारी (पान ४ वर)

# औषध निर्माण शास्त्र पेपरफुटीच्या चौकशीस मुंबईचे पथक दाखल

नंदुरबार, दि.२८ (प्रतिनिधी)- औषध निर्माण शास्त्र पेपरफुटी प्रकरणातील कौटिल्य अकॅडमीचे संचालक प्रवीण पाटील हे अद्याप संपर्काबाहेर असल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी मुंबईचे पोलीस पथक आज नंदुरबारमध्ये दाखल झाले.

चौकशीसाठी आलेल्या पोलीस पथकाकडून पेपरफुटी प्रकरणातील विविध पैलूंचा तपास करण्यात येत असून, या गैरप्रकाराशी संबंधित अनेक कंगोरे उलगडण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रकरणात आणखी काही महत्त्वाची माहिती आणि धागेदोरे हाती लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या तपासाकडे विद्यार्थी, पालक आणि शैक्षणिक क्षेत्राचे लक्ष लागले असून, पुढील चौकशीत कोणती माहिती समोर येते याकडे सर्वांचे लक्ष आहे. प्रवीण पाटील यांनी यापूर्वीच खुलासा करीत आपण कुठल्याही चौकशीला सामोरे जायला तयार आहोत, असे म्हटले होते. मात्र त्यांच्या मोबाईल आज बंद होता.

## पूर्व-वैमनस्यातून देवपूरात मारहाण

धुळे, दि.२८- पूर्व वैमनस्यातून चार संशयितांनी घरात घुसून कुटुंबीयांना मारहाण केली. सोन्याची मंगलपोतसह दह हजारांची रोकड लुटून नेली.

विष्णूनगर येथील शीतल किशोर गायकवाड यांच्या घरी अनिल दाजमल गायकवाड, विशाल अशोक कुऱ्हाडे, विशाल उर्फ खिचडी, राहुल प्रदीप कोळी यांनी सोमवारी (ता.२७) दुपारी कुरापत काढून वाद घातला. शीतल गायकवाड यांच्या घरात जबरदस्तीने प्रवेश केला. त्यानंतर शीतल यांच्यासह त्यांचे पती किशोर, सासू कल्पना गायकवाड यांना लाकडी दांडके व पावडीच्या दांडक्याने मारहाण केली. कल्पना गायकवाड यांच्या गळ्यातील सोन्याची (पान ४ वर)

# सतरा तोळे दागिने घेवून फसवणूक शेटे कुटूंबियांवर गुन्हा दाखल

**नंदुरबार, दि.२८ (प्रतिनिधी)- नंदुरबार शहरातील एका महिलेची पाणी बॉटल मशीन दुरुस्ती व बॉटलिंग व्यवसायात भागीदारी देण्याचे आमिष दाखवून १७ तोळे सोन्याचे दागिने घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

फिर्यादी गणेश कॉलनी, म्हाडा, नंदुरबार येथील रहिवासी असून त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी १) कुणाल शेखर शेटे, २) शेखर शेटे आणि ३) सरला शेखर शेटे (सर्व रा. प्लॉट नं. ४५, लक्ष्मी नगर, कोरीट रोड, नंदुरबार) यांनी फिर्यादी व त्यांच्या पतीचा विश्वास संपादन केला. पाणी बॉटल मशीन दुरुस्तीसाठी तसेच बॉटलिंग व्यवसायात भागीदार करून घेण्याचे आश्वासन देत बँकेत गहाण ठेवण्याच्या कारणावरून त्यांच्याकडून १७ तोळे सोन्याचे दागिने घेतले. मात्र ते दागिने आजपर्यंत परत न करता फसवणूक केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

फसवणुकीतील दागिन्यांमध्ये ६ तोळे राणीहार, १ तोळा कानातले (झुबे), १.५ तोळे नेकलेस, १.५ तोळे मंगळपोत, १.५ तोळे जेन्ट्स (पान ४ वर)

# होमिओपॅथीला महा. मेडिकल कौन्सिलची नोंदणी देण्यास वैद्यकीय संघ.चा विरोध

**धुळे, दि.२८- काही होमिओपॅथी (बीएचएमएस) चिकित्सक महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडून नोंदणी मिळावी, या मागणीसाठी आंदोलन करत असल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर अशा कोणत्याही दबावाला बळी पडून बीएचएमएस चिकित्सकांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी देण्याचा निर्णय शासनाने अथवा संबंधित यंत्रणांनी घेऊ नये, अशी ठाम भूमिका आय.एम.ए. महाराष्ट्र राज्य, एमएआरडी, एसएमआय, एमएसएन, जेडीएन तसेच इतर समविचारी वैद्यकीय संघटनांनी व्यक्त केली आहे.**

वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण आणि कायदेशीर पात्रता यांमध्ये स्पष्ट भेद असताना विविध वैद्यकीय पद्धतींचे एकत्रीकरण करण्याचा कोणताही प्रयतक हा वैज्ञानिक दृष्टिकोन, वैद्यकीय मानके आणि रुग्णांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर परिणाम करणारा ठरू शकतो. अशा कोणत्याही निर्णयामुळे आरोग्य व्यवस्थेवर दूरगामी आणि प्रतिकूल परिणाम होण्याची भीती संबंधित संघटनांनी व्यक्त केली आहे.

याच कारणास्तव, शासनाने अशा प्रकारचा कोणताही निर्णय पुढे नेल्यास आय.एम.ए. महाराष्ट्र राज्य,एमएआरडी, एसएमआय, एमएसएन, जेडीएन तसेच इतर समविचारी वैद्यकीय संघटनांशी संलग्न डॉक्टर उद्यापासून तात्काळ राज्यव्यापी सेवा बंद आंदोलन सुरू करतील, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनामध्ये बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) तसेच आपत्कालीन (ईमरजन्सी) सेवा देखील बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात येऊ शकतो.

हा निर्णय कोणत्याही भावनिक प्रतिक्रियेतून नसून रुग्णांच्या सुरक्षिततेचे संरक्षण, वैद्यकीय व्यवसायातील व्यावसायिक गुणवत्ता आणि वैज्ञानिक वैद्यकीय सेवांची विश्वासार्हता कायम राखण्यासाठी घेतला जात असल्याचे (पान ४ वर)

# आपला महाराष्ट्र

## डाकूंच्या चंबळ खोऱ्यात अहिंसेचे पाठ

एकेकाळी चंबळ खोऱ्यातील डाकूंच्या चकमकी, लुटा लुटीच्या कथा सर्वदूर ऐकायला मिळत असत. दिल्लीला जाताना मोरेना या स्टेशनच्या पुढे आणि धौलपूर स्टेशनच्या आधी चंबळ नदीचे खोरे लागते. रेल्वेतून चंबळ खोऱ्याचा भला मोठा पट्टा दिसतो. कुठेच झाड नाही, जंगल नाही परंतु मोठमोठ्या दऱ्यांमध्ये डाकूंचा संचार असायचा. मध्य प्रदेश आणि राजस्थानात त्यांनी अनेक वर्षे थैमान घातले होते. फूलन देवी त्यापैकी एक होती. मोठ्या प्रमाणावर मनुष्यसंहार करणाऱ्या आणि संपत्ती लुटणाऱ्या फूलन देवीला लोकांनी लोकसभेवर निवडून पाठवले होते. आचार्य विनोबांनी आणि त्यानंतर लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी डाकूंचे समर्पण घडवून आणले होते. फूलन देवी वर तर चित्रपट निघाला होता. बँडिट क्वीन असे त्या चित्रपटाचे नाव होते. डाकूंच्या समर्पणानंतर अनेकांचे सरकारने पुनर्वसन केले. त्यांना तुरुंगातून मुक्त केले. सर्वसामान्य माणसाप्रमाणे पुढे त्यांनी जीवन व्यतीत करण्यास सुरुवात केली. आजही त्यांच्या पुढच्या पिढ्या चंबळ खोऱ्यात आहेत. परंतु डाकूगिरी थांबलेली आहे. अशा प्रदेशात अहिंसेसाठी विद्यालयाची स्थापना हा एक अफलातून प्रयोग सुरू करण्यात येणार आहे. सर्वोदय चळवळीतील दीर्घ काळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची ही संकल्पना आहे.

हिंसा म्हणजे केवळ बंदूक किंवा सशस्त्र संघर्ष नव्हे तर शोषण, विषमता आणि अन्याय ही देखील हिंसेचीच रूपे आहेत. घरातही हिंसाचार चालतात.व्यक्तिगत जीवनात घरात हुकूमशहा बनून अधिकार गाजविणे ही हिंसा आहे.शेतमजुरा कडून कमी मोबदला देऊन जास्त काम करून घेणे हिंसेत मोडते.घरात काम करणाऱ्या महिलांच्या श्रमाचे शोषण ही हिंसा आहे. एवढेच नव्हेतर कुणाचे मन दुखावेल असे वागण्यात ही हिंसा आहे.त्यामुळे अहिंसक समाजाची उभारणी हा केवळ विचारांचा विषय नसून ती एक सातत्यपूर्ण सामाजिक साधना आहे. त्या पार्श्वभूमीवर चंबळच्या भूमीत प्रस्तावित अहिंसा विद्यालय हा तरुण पिढीला संवेदनशील, सजग आणि परिवर्तनाचा वाहक बनविण्याचा एक अभिनव प्रयतक असेल.त्यांच्या मनातून हिंसेचे समूळ उच्चाटन करणे हा या विद्यालयाचा उद्देश आहे.हिंसामुक्त समाजाची निर्मिती हा दीर्घकालीन प्रवास आहे. हिंसेचे अनेक स्तर असतात आणि प्रत्येक स्तर समजून घेत त्यावर उपाय शोधत पुढे जाणे सोपे नसते. काही ठिकाणी सहकार्य मिळते, तर काही ठिकाणी विरोधही सहन करावा लागतो. एखाद्या प्रश्नावर साथ देणारे लोक दुसऱ्या प्रश्नावर विरोधक बनतात. चंबळ खोऱ्यात दरोडेखोरांच्या आत्मसमर्पणाच्या वेळी जे लोक सर्वोदयी कार्यकर्त्यांच्यां पाठीशी उभे राहिले, तेच नेमका आदिवासींना जमिनीचे हक्क मिळवून देण्याचा मुद्दा पुढे आला तेव्हा विरोध करण्यासाठी यापुढे आले. आदिवासींच्या प्रश्नावर जे सहकार्य करीत होते दारूमुक्तीच्या चळवळीत विरोधात उभे राहिले.त्यांचा दारूला पाठिंबा होता. थोडक्यात सांगावयाचे तर

सर्वांना सोबत घेऊन अहिंसक समाज घडविण्याची कल्पना ऐकायला जितकी सुंदर वाटते, तितकीच ती प्रत्यक्षात भयंकर कठीण असते.अनेक आव्हाने या कामात उपस्थित होतात, त्यामुळे अहिंसेची वाटचाल खडतर होऊन बसते. म्हणूनच कार्यकर्त्यांनी हिंसा आणि अहिंसा या दोन्ही संकल्पनांचा सखोल अभ्यास केला पाहिजे.

प्रत्येक टप्प्यावर कोण साथ देईल, कोण देणार नाही, याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करावे लागेल. जे साथ देत नाहीत, त्यांनाही विश्वासात घेण्यासाठी सातत्याने प्रयतक आणि तयारी करावी लागते.हीच खरी अहिंसक समाज उभारणीची कसोटी आहे. तसा प्रयतक सर्व प्रथम चंबळ खोऱ्यात आचार्य विनोबांनी केला. त्यांनी करुणेच्या बळावर जमिनीचा प्रश्न काही प्रमाणात सोडविण्यात यश मिळविले. अहिंसेच्या प्रयोगात व्यक्तिमत्त्वाला विशेष महत्त्व असते. महात्मा गांधींनी जे साध्य केले ते प्रत्येकाला शक्य होईलच असे नाही. विनोबा भावे यांनी जे करून दाखविले, तेही सर्वांच्या आवाक्यातील कार्य नाही. त्या प्रयतकांपर्यंत लोकनायक जयप्रकाश नारायण पोहचले होते.आज विविध अहिंसक चळवळींमधून जे बदल दिसून येतात, ते पूर्वसूरींच्या अथक प्रयत्नांचे फलित म्हणावे लागेल. गांधी किंवा विनोबा यांच्या इतक्या सखोल पातळीवर अहिंसेचे आकलन सर्व आंदोलनकर्त्यांना नसले, तरी अहिंसक मार्गाने मिळणारे छोटे–मोठे यशही महत्त्वाचे आहे. निदान त्या कार्यकर्त्यांच्या मनात अहिंसेबद्दल निष्ठा आणि श्रद्धा तरी आहे.खरी अडचण तेव्हा निर्माण होते, जेव्हा लोक असा निष्कर्ष काढतात की अहिंसक मार्गाने समाजपरिवर्तन शक्य नाही, किंवा हिंसाच एकमेव पर्याय आहे. मअहिंसा विद्यालयफ ही संकल्पना अशा मानसिकतेला पर्याय म्हणून पुढे आली आहे.

या विद्यालयाचा उद्देश असा आहे की, पुस्तके, चर्चा, अभ्यास आणि प्रत्यक्ष भ्रमंती यांच्या माध्यमातून तरुणांना अहिंसेची शक्ती समजून घेण्यास मदत करावी. विविध प्रकारच्या प्रचाराच्या प्रभावाखाली जाण्यापूर्वी त्यांना अहिंसेची खरी ताकद अनुभवता यावी. प्रत्येक व्यक्तीला शांततामय आणि सुरक्षित समाजात जगण्याची इच्छा असते; पण असा समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने स्वतःही योगदान दिले पाहिजे. अहिंसा विद्यालय हे त्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या विद्यालयाशी जोडला जाणारा प्रत्येक विद्यार्थी केवळ ज्ञान मिळवणार नाही, तर आपल्या आचरणातूनही अहिंसक समाजरचनेचा सक्रिय भागीदार बनेल.दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष सत्य आणि अहिंसा आचरणात आणणे हा उद्देश विद्यालयाच्या स्थापनेमागे आहे.चंबळ खोऱ्याचे वातावरण या उपक्रमासाठी अत्यंत अनुकूल आहे. आणि मध्ये येथे झालेल्या दरोडेखोरांच्या ऐतिहासिक आत्मसमर्पणामुळे निर्माण झालेल्या सामाजिक वातावरणावर अहिंसा विद्यालय उभे राहू शकते. चंबळच्या या प्रयोगातून शिकू इच्छिणाऱ्या देश–विदेशातील लोकांसाठी गांधी आश्रम संचालित हे विद्यालय एक प्रेरणास्थान ठरेल. दरोडेखोरांचे आत्मसमर्पण ही स्वतः मध्ये एक मोठी कथा आहे; पण त्यानंतर संपूर्ण चंबळ खोऱ्यात घडलेले शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनही तेवढेच अभ्यासण्या सारखेआहे.

आज ज्या समाज घटकांनी अहिंसेच्या मार्गावर काही पावले टाकली आहेत, ते पुढे जाण्यास अजूनही संकोच करतात. पुढे जाण्यासाठी. ते धजावत नाहीत. कदाचित त्यांना अहिंसेचे तत्व समजून घेण्यास अडचण येत असावी. हिंसामुक्त समाज म्हणजे केवळ बंदुकीची हिंसा नव्हे; तर शोषण, दडपशाही आणि अन्याय यांचाही पूर्ण अंत होणे होय. शोषणमुक्त समाजच खऱ्या अर्थाने अहिंसक समाज असतो. केवळ शस्त्रांची हिंसा थांबली म्हणून अहिंसक समाज निर्माण झाला, असे मानणे ही मोठी चूक ठरेल. हिंसेची इतर सर्व रूपे संपविल्यानंतरच खऱ्या अर्थाने अहिंसक समाजाची निर्मिती होईल. ही व्यापक समज विकसित करण्यासाठी अहिंसा विद्यालय महत्त्वाची भूमिका बजावू शकते. देशभरात अशा सखोल जाणिवेने प्रेरित होऊन अहिंसक समाजनिर्मितीसाठी कार्य करणाऱ्या हजारो तरुणांची कल्पना डोळ्यांसमोर उभी केली, तरी ही प्रक्रिया किती विलक्षण आहे, याची जाणीव होते. ही चळवळ केवळ भारतापुरती मर्यादित राहणार नाही. तिचे प्रतिबिंब जगभर उमटेल आणि भारताला जागतिक स्तरावर नवा सन्मान मिळवून देईल. आज संपूर्ण जगाला अहिंसा आणि शांततेची सर्वाधिक गरज आहे. या परिवर्तनाची झुळूक भारतातून वाहिली पाहिजे आणि तिचे केंद्र चंबळ खोरे बनू शकते. दरोडेखोरांच्या आत्मसमर्पणाच्या वेळी ज्या समाजाने मनापासून साथ दिली, त्याच समाजाकडून या नव्या प्रयतकालाही तितक्याच उत्साहाने पाठिंबा मिळेल, अशी अपेक्षा ही संकल्पना मांडणाऱ्या कार्यकर्त्यांची आहे. गांधी मार्ग त्यात केंद्र स्थानी असल्याने ती पूर्णत्वास जाईल अशीच मांडणी होत आहे.नुकतेच झालेले नवी दिल्लीच्या जंतरमंतर वरील आंदोलन हे अहिंसक आणि संवैधानिक तत्वांचा पुरस्कार करणारे होते.म्हणजेच गांधी आंबेडकरांच्या विचारसरणीला अनुकूल होते.याचा अर्थ गांधी आंबेडकरांच्या तात्विक भूमिकेची प्रासंगिकता आजही ताजी असून चंबळमध्ये विद्यालयाच्या रूपाने ती निश्चितच फुलेल.



## एच. आर. पटेल महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान कथा दिवस साजरा

**शिरपूर, दि. २८ (प्रतिनिधी)- एच. आर. पटेल कला व विज्ञान महिला महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान कथा दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विज्ञानकथा लेखक, खगोलशास्त्रज्ञ आणि ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. जयंत नारळीकर यांच्या गौरवार्थ हा कार्यक्रम इंग्रजी, हिंदी व मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. गजानन पाटील होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. युवराज पवार यांनी केले. त्यांनी डॉ. जयंत नारळीकर यांच्या साहित्याचा थोडक्यात परिचय करून देत राष्ट्रीय विज्ञान कथा दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट केला.

अध्यक्षीय संबोधनात प्राचार्य डॉ. गजानन पाटील यांनी डॉ. जयंत नारळीकर यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत त्यांच्या विज्ञान साहित्याची वैशिष्ट्ये विद्यार्थिनींसमोर मांडली. विज्ञानामुळे मानवी जीवन अधिक समृद्ध झाले असून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे विज्ञानाच्या कक्षा अधिक विस्तारत असल्याचे त्यांनी सांगितले. विज्ञानाचे मानवी जीवनातील उपयोग तसेच त्याच्या संभाव्य दुरुपयोगाबाबतही त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. जयंत नारळीकर यांच्या विज्ञानकथा, विज्ञान कादंबऱ्या आणि विज्ञानावर आधारित साहित्याचा परिचय विद्यार्थिनींना करून देण्यात आला. विज्ञानकथा या कल्पनाशक्ती आणि वैज्ञानिक सत्य यांच्या संगमातून घडत असून चंद्र, मंगळ, परग्रह, उपग्रह, अंतराळ संशोधन, चांद्रयान यांसारख्या विषयांमधून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो, असे मत वक्त्यांनी व्यक्त केले. तसेच दूरदर्शन, मोबाईल, उपग्रह तंत्रज्ञान यांसारख्या विज्ञानाच्या देणग्यांचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी प्रा. भाकर खैरनार यांनी आभार मानताना विज्ञान आणि साहित्य यांचा परस्परसंबंध स्पष्ट केला. विद्यार्थिनींमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

या कार्यक्रमास प्रा. रितेश शिरसाठ, प्रा. गुलाबसिंग वळवी, प्रा. भाग्यश्री चव्हाण, बहुसंख्य विद्यार्थिनी उपस्थित होते.

## मोराणे सैनिकी विद्यालयात कारगिल विजय दिन साजरा

धुळे, दि.२८(प्रतिनिधी)- इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान संचलीत श्री छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालय मोराणे प्र.नेर येथे कारगिल विजय दिवस नुकताच साजरा करण्यात आला. यावेळी शहिदांना अभिवादन करण्यात येवुन कारगिल युध्दातील स्मृतींना उजाळा देण्यात आला. याप्रसंगी विविध मान्यवर उपस्थित होते.

मोराणे येथील सैनिकी विद्यालयाच्या प्रांगणात कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. कारगिल युद्धात प्रत्यक्षात सहभागी असलेले, शाळेचे शिक्षण निर्देशक सुभेदार मेजर संजय विनायक देसले व सुभेदार मेजर निलेश उमराव बोरसे यांच्या हस्ते शहिदांना पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे व सचिव शालीनीताई भदाणे यांनी शहिदांना पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. शाळेचे प्राचार्य एस.बी.गरुड, उप प्राचार्य एन.जे. देवरे देवरे व यांनीही पुष्प अर्पण करून शहिदांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक बी.एच. मगर व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रत्यक्षात कारगिल युध्दात सहभागी झालेले व सध्या विद्यालयात शिक्षण निर्देशक म्हणुन कार्यरत असलेले सुभेदार मेजर संजय विनायक देसले व सुभेदार मेजर निलेश उमराव बोरसे यांनी युध्दातील आठवणींना उजाळा दिला. आभार बी.एच.मगर यांनी मानलेत.





## समाज कल्याण मंत्र्यांच्या उपस्थितीत राजेंद्र छात्रालयात कृतज्ञता सोहळा



**धुळे, दि.२८- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ३१ जुलै १९३७ रोजी धुळे येथील राजेंद्र छात्रालयास भेट दिली होती. विद्यार्थ्यांसमवेत स्नेहपूर्ण गप्पा आणि भाजी-भाकरीच्या जेवणाचा आस्वाद बाबासाहेबांनी घेतला. आपल्या ज्ञानाला साजेशा सुंदर अक्षरात त्यांनी राजेंद्र छात्रालयाविषयी अभिप्राय नोंदवला. बावीस विद्यार्थ्यांची अभ्यासु वृत्ती, तेथली स्वच्छता आणि भोजन विषयी त्यांनी समाधान व्यक्त केले.**

ह्या आठवणीचा उत्सव दरवर्षी राजेंद्र छात्रालय, काकासाहेब बर्वे कन्या छात्रालय आणि इतर संस्थेचे हजारो विद्यार्थी ३१ जुलैला बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी उपस्थित राहतात. ह्यावर्षी ३१ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता राजेंद्र छात्रालयाच्या नव्या वास्तुत महाराष्ट्र राज्याचे समाजकल्याण मंत्री ना.संजय शिरसाठ उपस्थित राहणार आहेत.

या कृतज्ञता सोहळ्या प्रसंगी खा.शोभा बच्छाव, आ.अनुप अग्रवाल, आ.भदाणे, आ.गावीत, महापौर मायादेवी परदेशी, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, सभापती लता पोदार, माजी आमदार कुणाल पाटील, डॉ. दिलीप पाटील, डॉ. बापूसाहेब सैंदाणे, रवि बेलपाठक, आशिष अजमेरा, डॉ. संजय संघवी, स्काऊट कमिश्नर भा.ई. नगराळे, संभु पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी समाजसेवी बंधु-भगिनींनी अवश्य उपस्थित राहावे. असे आवाहन दलित मित्र मधुकर शिरसाठ, डॉ. प्रा. विलास चव्हाण, रमेश दाणे, मालर्ती शिरसाठ, जितेंद्र पिंगळकर, कृष्णा शिरसाठ आणि जगदीश देवपुरकर यांनी केले आहे.

## शिर्वे फाट्याजवळ भीषण अपघात गंभीर जखमी दुचाकीस्वाराचा मृत्यू

**नंदुरबार, दि.२८ (प्रतिनिधी)- अक्कलकुवा-तळोदा मार्गावरील शिर्वे फाट्याजवळ झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिरोज पिरबक्ष मक्राणी (वय ४०, रा. मक्राणीफळी, ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार) हे जीजे१६/झेड-४४६५ क्रमांकाच्या काळ्या रंगाच्या सीडी डॉन दुचाकीवरून अक्कलकुवाहून तळोद्याकडे जात होते. त्यावेळी शिर्वे फाट्याजवळ समोरून येणाऱ्या एमएच२९/सीजी-७४७४ क्रमांकाच्या वाहनाच्या चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालवत दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात फिरोज मक्राणी यांच्या दोन्ही पायांना व पोटाला गंभीर दुखापत झाली. तसेच त्यांच्या दुचाकीचेही मोठे नुकसान झाले. अपघातानंतर संबंधित वाहनचालकाने जखमींना कोणतीही मदत न करता घटनास्थळावरून पलायन केले. जखमी फिरोज मक्राणी यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी अक्कलकुवा येथील हलीम पिरबक्ष मक्राणी (वय ३२) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र खैरनार करीत आहेत.

## सावळदेला मंदिराची दानपेटी फोडली

शिरपूर दि.२८ (का.प्र.)- तालुक्यातील सावळदे येथील दत्त मंदिरातील दानपेटी फोडून चोरट्यांनी सुमारे २५ हजार रुपयांची रोख रक्कम चोरुन नेली. ही घटना ३० जून ते एक जुलैच्या दरम्यान घडल्याचा अंदाज आहे. कन्हय्यालाल शिवदास गुजर यांच्या निदर्शनास दानपेटी फोडल्याची बाब आली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला असून हवालदार अतुल पाटील तपास करीत आहेत.

## चांगल्या रस्त्यांसाठी शहाद्यात नागरिक आक्रमक, बेमुदत आंदोलनाचा इशारा

**शहादा, दि.२८(का.प्र.)- चांगले रस्ते हा शहादाच्या प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे, कोणाचाही उपकार नाही! या ठाम भूमिकेतून आता शहादा शहरातीलरस्त्यांच्यादुरवस्थेविरोधात नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात आले आहेत. प्रशासनाला जाग आणण्यासाठी १६ ऑगस्ट पासून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सोशल मीडियावरील पोस्ट मधून देण्यात आला आहे.**

गेल्या अनेक दिवसांपासून शहादा नगरपरिषद हद्दीतील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असून, त्याचा नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाला अंतिम इशारा देण्यात आला आहे. जर दि. १५ ऑगस्टपर्यंत शहादा नगरपरिषदेने शहरातील रस्त्यांची मजबूत आणि योग्य दर्जाच्या साहित्याचा वापर करून पुनर्बांधणी व दुरुस्ती केली नाही, तर १६ ऑगस्ट पासून हे आंदोलन सुरू होणार आहे.हे आंदोलन फक्त आणि फक्त शहाद्यातील सर्व रस्त्यांची संपूर्ण, दर्जेदार आणि टिकाऊ दुरुस्ती पूर्ण होईपर्यंतच सुरू राहील.कोणतेही तोंडी आश्वासन, खोटी वचने किंवा धमक्या या आंदोलनाला थांबवू शकत नाहीत.ही लढाई शहादा शहराच्या आणि नागरिकांच्या घटनात्मक अधिकारासाठी असून, रस्ते दुरुस्त होईपर्यंत हा संघर्ष असाच सुरू राहील.शहाद्याच्या भविष्यासाठी आणि मूलभूत हक्कांच्या प्राप्तीसाठी आता शहरातील सर्व नागरिकांनी एकजुटीने आणि ठामपणे एकत्र येण्याचे आवाहन शहादा व्हिजन या सोशल मीडिया साईटवर उपलब्ध असलेल्या पोस्टद्वारे करण्यात आले आहे. नगरपरिषद प्रशासन या इशाऱ्याची वेळीच दखल घेऊन १५ ऑगस्टपूर्वी रस्त्यांचे काम सुरू करते की, आंदोलनाला सामोरे जाते याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## महिला सदनतर्फे कांदे नवमी उत्साहात साजरी

धुळे, दि.२८- महिला सदनतर्फे वार्षिक सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांतर्गत कांदे नवमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

अध्यक्षा वीणा चौधरी यांच्या हस्ते गणेश वंदनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या सैनिक व पोलिसांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी शारदा धोंडे, रजनी भावसार, वंदना मांडेकर, सुलोचना राठोड, सुरैया पठाण, नीता रनाळकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.



चातुर्मासात कांदे-लसूण वर्ज्य करण्यामागील कारणे मीनाक्षी डोरी व सुजान जडे यांनी सांगितली. कार्यक्रमासाठी हर्षा कुलकर्णी, मानसी शिंदे, मनीषा बडगुजर, आरती हिरे, माधुरी बडगुजर, आरती महाले, वंदा राव, पुष्पलता देशमुख, मंगला वाघूळ, सुनिता डोंडे, शोभा पाटील, विद्या खैरनार, मीरा देव, सरिता खैरनार, मीना रनाळकर, शैला भानगांवकर आदींनी सहकार्य केले. या कार्यक्रमास एकूण पस्तीस महिला उपस्थित होत्या. सूत्रसंचालन वंदना मांडेकर यांनी केले तर आभार वीणा चौधरी यांनी मानले.


### प्रकाश में आज पैसा ये पैसा





जैकी श्रॉफ मीनाक्षी शेषादी नुतन गुलशन ग्रोवर अमरोशपुरी बिंदु ओमशिवपुरी

### शब्दकोडे क्रमांक : २४२३



**आडवे शब्द :** १.संसदेचा लोकनियुक्त सदस्य ४.जुन्या काळातील हाताच्या बोटांनी मोजायचे एक माप ५.जंगलातून जाणारा रस्ता ७.वार- उलट लिहा ८.महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध नदी किंवा दूध संघ १०.शरीराचा मागील भाग किंवा पुस्तकातील धडा ११.मुंबईला पाणीपुरवठा करणारे ठाणे जिल्ह्यातील एक प्रसिद्ध धरण/तलाव १२.राग,संताप किंवा क्षोभ १३.अवलंबून असणे किंवा विसंबून राहणे १६.गाणी किंवा कविता लिहिणारी व्यक्ती १७.विस्तव १८.पगार २०.जादुई कथांमधील क्रूर स्त्री किंवा चेटकीण २२.आर्थिक बाजारातील पत किंवा अब्रू २३.संमती न देणे २५.फसवणूक किंवा विश्वासघात २७.तंबाखू भाजून तयार केलेले दात घासण्याचे मंजन २९.दोरी ३१.क्षण ३३. एखादी चौकशी किंवा कामासाठी नेमलेले अधिकृत मंडळ ३५.चिन्ह,खूण किंवा एखादे रूपक ३७.डोळे मिटून चिंतनात मग्न असणारा ३८.सौंदर्याची देवता किंवा कामदेवाची पत्नी ३९.वर्तमानपत्र,कागद-इंग्रजीत ४१.जादू करणारा,कपटी किंवा भ्रम निर्माण करणारा ४३. स्वतःच्या मर्जीनं चालणारा किंवा हुकूमशाही वर्तन ४५.पहा ४६.छत ४८.चोप **उभे शब्द :** १. मिठाच्या पाण्याची चव २.एक आणि पाव हिस्सा ४.संगीत क्षेत्रातील सरस्वती देवीचे प्रिय मानले जाणारे तारांचे वाद्य ५. जून ६.वादा ९.पाताळ १०.अधम,पुण्य-विरुद्ध १२.शुष्क १३.नंतर १४.चांदी १५.पतीची दुसरी पत्नी १७.शपथ १९.बिनकामाचा-हिंदीत २१. हिंदू पौराणिक कथेनुसार मृत्यूची देवता २२.वेतन २४.खास २६. एखाद्या व्यक्तीला जबरदस्तीने किंवा फसवून पळवून नेणे २८.श्री राम जन्मभूमी ३०.थंड,गार ३२.एखाद्या कृतीला किंवा घटनेला मिळालेले चोख उत्तर ३४.बंदूकधारी-इंग्रजीत ३६.चव नसलेले, अळणी किंवा बेचव अन्न ४०.दुधापासून बनवला जाणारा एक पदार्थ ४१.मराठी कालगणनेतील एक महिना ४२.घर बांधण्यासाठी रचतात ४३.बुद्धी ४४. आईचा भाऊ

### शब्दकोडे क्रमांक : २४२२ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | पे | क्षा | | प | | जा | ल | ना | | का | म |
| हं | स | | ख | डा | जं | गी | | सा | प | ळा | |
| का | | त | ला | व | | र | द | | ग | | मो |
| र | घु | वं | शी | | मो | | ख | डी | | ब | घ |
| | ब | ग | | क | र | त | ल | | च | क | ली |
| पे | ड | | तु | ला | | ह | | | | वा | |
| रू | | ना | क | | सु | कू | न | | को | स | ला |
| | सा | | डा | वा | | ब | ट | वा | रा | | ट |
| आ | हे | र | | य | स | | ख | रा | | ल | |
| | ब | | सा | दा | | मो | ट | | सा | वं | त |
| ले | | खा | स | | मो | द | | ल | | ग | र |
| ट | क | | र | वी | | क | ल | क | ल | | स |









## CHANGE NAME

MY OLD NAME WAS
**SHAIKH IMRAN SHAIKH IBRAHIM**
MY NEW NAME IS
**IMRAN SHAIKH IBRAHIM MANYAR**
ADD- AT POST. NARDANE, NARDANE, DIST-DHULE-425404

## CHANGE NAME

MY OLD NAME WAS
**KHATIK SHAIKH MOSIM SHAIKH ESRAIL**
MY NEW NAME IS
**MOSIM ISRAIL KHATIK**
ADD- COLLEGE SANJAY NAGAR, PIMPALNER- DIST-DHULE-424306 MS.

## CHANGE NAME

MY OLD NAME WAS
**MANIYAR SAYMA BANO HAJI ABDUL HANNAN MANIYAR**
MY NEW NAME IS
**SAYMA IMRAN MANYAR**
ADD- SHIV SHAKTI COLONY NEAR PANI TAKI NARDANE DIST-DHULE-425404

## पत्ता बदल

मी सोनिया जयंत वानखेडे जाहीर करिते की माझा जुना पत्ता- Suman Hospital, Sakri Road, Dhule. हा होता. माझ्या पत्त्यात बदल झाला असून नविन पत्ता- J.S.Tower-1, plot no.1/B, Professor colony, Wadibhokar Road, Deopur, Dhule. असा आहे.

## CHANGE NAME

MY OLD NAME WAS
**FATEMAH ABID SHAIKH**
MY NEW NAME IS
**FATIMA AABID SHAIKH**
ADD- MOHAMMADI NAGAR, DEOPUR, DHULE.

## CHANGE NAME

MY PREVIOUS NAME WAS
**SHAMSUNNISA JAVID AHMAD**
AND MY NEW NAME IS
**SHAMSUNNISA JAVEED AHMAD MOMIN**
ADD- LANE NO.14 MADHAVPURA, NEAR MAKKA MASJID, DHULE-424001.

## भाऊराव बागुल लिखित संघर्ष चे प्रकाशन

शहादा, दि.२८(प्रतिनिधी)- एका पोलीस अधिकाऱ्याने जीवनात अविरत संघर्ष करुन आयुष्याच्या विविध टप्प्यात सर्व प्रकारच्या श्रमांची कामे केली आणि जिद्दीने यशोशिखर गाठले, संपूर्ण जीवन सफल केले त्याचीच ही यशोगाथा म्हणजे त्यांचे आत्मकथन संघर्ष होय. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी भाऊराव बागुल लिखित संघर्ष या पुस्तकाचे प्रकाशन मित्तल ग्रुपचे पाहुबाभाई नरोत्तमभाई बागुल यांच्या शुभहस्ते शहादा येथील एस कुमार लान्स मध्ये पार पडले.

या प्रसंगी स्वतः लेखक भाऊराव बागुल, प्रा.जीवन जगदाळे यांनी पुस्तकाविषयी सखोल विवेचन केले. उपस्थित मान्यवरांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. अध्यक्षस्थानी पाहुबा बागुल तर प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त उपजिल्हाधिकारी भागवत सैंदाणे, उपविभागीय पोलीस अधिकारी गुलाबराव पाटील. पितांबर देवरे, प्रदीप नवसारे, एन डी माळी, भरतभाई,डॉ.प्रा. विश्वास पाटील, प्रा.दत्ता वाघ, कैलास भावसार, नवनीत शिंदे, प्रल्हाद सोनवणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीपक माळी यांनी तर आभार सुरेश जाधव यांनी मानले.

## जाहीर नोटीस

### धुळे येथील मे. अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात

दि. २८/०७/२०२६
जन्म-मृत्यू /रजि नं.५१/२०२६

अर्जदार
**शाहिदरजा सिराजोद्दीन शेख**, उ. वय ४० वर्षे,
रा.जपान जीन, इस्तेमा नगर, अमळनेर ता. अमळनेर जि. जळगांव
मो. नं. ९६३७६२५३३९ ... अर्जदार

॥ विरुद्ध॥

**धुळे महानगरपालिका धुळे** ...जाबदेणार
(नोटीस निबंधक जन्म मृत्यू नोंद विभाग,महानगरपालिका,धुळे यांचेवर करण्यात यावी.)

ज्याअर्थी वरील अर्जदार **शाहिदरजा सिराजोद्दीन शेख** यांचा मुलगा नामे कु. असजद शाहिदरजा शेख याचा जन्म दि. ०६/१०/२०२१ रोजी कपिल क्लिनिक धुळे ता. जि. धुळे येथे झालेला असून त्यांची धुळे महानगरपालिका धुळे येथील दप्तरी नोंद नसल्याने व राहून गेल्याने जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ अन्वये आज रोजी अपर तहसिलदार धुळे शहर यांचे न्यायालयात जन्माची नोंद मा. निबंधक सो. जन्म मृत्यू नोंदणी विभाग, धुळे महानगरपालिका धुळे यांचे दप्तरी लावणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. ज्या अर्थी अर्जदार यांचा मुलगा याचा जन्म दि. ०६/१०/२०२१ ही जन्म/मृत्यू तारीख असून शासकीय कामी जन्म दाखल्याची गरज असल्याचे म्हटले आहे. त्यासाठी खालील प्रमाणे पुरावे जोडलेले आहेत.

१) आधारकार्ड, रेशनकार्ड, पॅनकॉर्ड.
२) वडिलांचा शाळा सोडल्याचा दाखला.
३) आईचा शाळा सोडल्याचा दाखला.
४) विज पावती, करपावती.
५) लसीकरणाचा पुरावा, रुग्णालय नोंदी

त्याअर्थी वरीलप्रमाणे नोंद करणेस कोणाचीही काही एक तक्रार/हरकत असल्यास त्यांनी सदर अर्जाचे चौकशीचे कामी उपरोक्त न्यायालयात दि. ०८/०८/२०२६ पावेतो स्वत: अगर वकिलामार्फत धुळे येथील मे. अपर तहसिलदार सो. धुळे शहर यांचे समक्ष हजर राहावे व आपले म्हणने, तक्रार व लेखी हरकत सादर करावी. अन्यथा कोणत्याही प्रकारे हरकत न आल्यास सदर कामी चौकशी होवून अर्जदाराचे नावाने जन्म/मृत्यू नोंद करुन घेण्याकामी योग्य ते आदेश निर्गमीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज रोजी प्रसिद्धीस दिली असे..

आदेशावरुन
सही...
**(वैशाली हिंगे)**
अपर तहसिलदार धुळे शहर

## रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी मौजे अवधान येथील गट नं. १०१/१/१०१/२अ१/१०१/२अ२/१०१/२ब पैकी १) प्लॉट नं. २५४ चे एकूण क्षेत्र १५० चौ. मी. चा बखळ प्लॉट यासी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. २३९, उत्तरेस : प्लॉट नं. २५३, दक्षिणेस : प्लॉट नं. २५५, २) प्लॉट नं. २५५ चे एकूण क्षेत्र १५० चौ. मी. चा बखळ प्लॉट यासी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. २३८, उत्तरेस : प्लॉट नं. २५४, दक्षिणेस : प्लॉट नं. २५६,येणे प्रमाणे वर्णनाचा आतील बखळ प्लॉट लग्नापूर्वीचे नांव आशा रामकृष्ण पाटील, लग्नानंतरचे नाव सौ. आशा दिलीप पाटील रा. अरुणकुमार वैद्य नगर, साक्री रोड, धुळे यांच्या मालकीचे व ताबे उपभोगातील आहे. सदर वरील प्रमाणे मिळकत ही आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असून बयाणा सुद्धा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना सर्व बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर बखळ प्लॉटवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहाराबाबत हरकत असल्यास,बखळ प्लॉटवर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर बखळ प्लॉटसंबंधी कोणत्याही प्रकारचा न्यायलयात दावा न्यायप्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदा पावती, विक्री पावती, खरेदी खत करुन दिलेले असल्यास असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर बखळ प्लॉट निर्वेध व निर्बोज समजून आमचे आशिल सदरहू बखळ प्लॉटचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या अशिलांच्या सुचनेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. स्थळ - धुळे, दि. २८/०७/२०२६.

**ॲड.अनिल सुरेश अग्रवाल**
ग. नं.४ भांडी बाजार,कांती कॉम्पलेक्स शेजारी,धुळे
मो.७७०९७७२७५७/७५८८८८४१०७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार तसेच सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी मौजे बाळापूर श्रीराम नगर, सेक्टर (२) नार्थ झोन गट नं. ४३ पैकी प्लॉट नं. ८ चे एकूण क्षेत्र १८० चौ. मी. चा बखळ प्लॉट यासी चतु:सिमा पुर्वेस : १२ मी. रस्ता, पश्चिमेस : गट नं. ३९, उत्तरेस : प्लॉट नं. ७ब, दक्षिणेस : ९ मी रस्ता येणे प्रमाणे वर्णनाचा आतील बखळ प्लॉट पुजा सुशील पटवारी रा. क्लासिक प्लॉझा गोखले रोड, ठाणे (प.) यांच्या मालकीचे व ताबे उपभोगातील आहे. सदर वरील प्रमाणे मिळकत ही आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला असून बयाणा सुद्धा दिलेला आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना सर्व बँक, पतपेढी, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर बखळ प्लॉटवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क व व्यवहाराबाबत हरकत असल्यास,बखळ प्लॉटवर कोणाचाही बोजा, खावटी हक्क, इतर हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाटी हक्क किंवा सदर बखळ प्लॉटसंबंधी कोणत्याही प्रकारचा न्यायलयात दावा न्यायप्रविष्ट किंवा प्रलंबित असल्यास तसेच कोणाचाही लाभात बक्षिसपत्र, सौदा पावती, विक्री पावती, खरेदी खत करुन दिलेले असल्यास असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुरावासह प्रत्यक्ष कळवावी. टपाल, फोनवर व वर्तमान पत्रात परस्पर हरकत मान्य होणार नाही.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास सदर बखळ प्लॉट निर्वेध व निर्बोज समजून आमचे आशिल सदरहू बखळ प्लॉटचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस ही आमच्या अशिलांच्या सुचनेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. स्थळ - धुळे, दि. २८/०७/२०२६.

**ॲड.अनिल सुरेश अग्रवाल**
ग. नं.४ भांडी बाजार,कांती कॉम्पलेक्स शेजारी,धुळे
मो.७७०९७७२७५७/७५८८८८४१०७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँकांना, हितसंबंधितांना सदर जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे महिंदळे येथील सर्व्हे नं.५९ पैकी नं.४२ चे एकूण क्षेत्र १९५ चौ.मी. २०९९ चौ.मी. फूट बखळ प्लॉट. यास विस्तारित सि.स.नं.१८८२ चे एकूण क्षेत्र १९० चौ.मी. सत्ताप्रकर क असा लागलेला आहे. यासी चतु:सीमा खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस- | १३.०० मी., | ९ मी. रस्ता, |
| पश्चिमेस- | १३.०० मी., | प्लॉट नं.२७, |
| दक्षिणेस- | १५.०० मी., | प्लॉट नं.४३, |
| उत्तरेस- | १५.०० मी., | प्लॉट नं.४१ |

येणे प्रमाणे ही मिळकत श्री.केशव प्रभाकर रासने रा.धुळे. यांचे ताबे उपभोगातील मालकीची होती व आहे सदर मिळकत ही आमचे पक्षकारांनी लेखी सौदा केला आहे. ह्या मिळकतीच्या खरेदीचा सौदा संबंधित पक्षकार पूर्ण करणार आहे.

तरी सर्वांना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सदर मिळकत संबंधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हितसंबंध देणे घेणे, मालकीहक्क, भाडेपट्टा व लीज, ताबा, गहाण, मृत्यूपत्र, दान, बोजा, कर्ज, लीज, टाच, वा वारस हक्क, खावटी ज.मु. वैगरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्यापासून ०८ दिवसाचे आत योग्य त्या कायदेशीर कागतपत्रांसह आमचे कार्यालयात हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहीर नोटीस वर्तमानपत्रात आल्यास त्या ग्राह्य धरण्यात येणार नाही व हरकती न आल्यास आमचे पक्षकार सदर मिळकत ही निर्बोज म्हणून खरेदी करतील . सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन आमचे मार्फत प्रसिद्ध करण्यात आली आहे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस होय.
ठिकाण- धुळे,
दिनांक:- २८/०७/२०२६.

**ॲड.आशा शिवकुमार डोंगरे**
(नोटरी भारत सरकार)
एफ-२५, पहिला मजला, गरूड कॉम्प्लेक्स, साक्री रोड, ता.जि.धुळे.
**फोन.नं.९९२३३६६१११**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे अवधान, ता.जि. धुळे येथील गट नं.१००/१/२ पैकी १) प्लॉट नं.३१ चे क्षेत्र ५२ चौ.मी. यांसी चर्तु: सिमा पुर्वेस : प्लॉट नं.३२, पश्चिमेस : प्लॉट नं.३०, दक्षिणेस : प्लॉट नं.३३, उत्तरेस : रस्ता. २) प्लॉट नं.३२ चे क्षेत्र ५७.५० चौ.मी. यांसी चर्तु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं.३१, दक्षिणेस : प्लॉट नं.३३, उत्तरेस : रस्ता. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत श्री.निलेश आनंदा खैरनार, रा.२३, मारुती नगर, चाळीसगांव रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्युपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, दावा, हितसंबंध वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रांशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- २८/०७/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. विकास विश्वास बोरसे, रा. कळंबू ता. शहादा जि. नंदुरबार यांनी दिलेल्या माहिती व सुचनेनुसार कळविण्यात येते की, कळंबू ता. शहादा जि. नंदुरबार येथील आमचे पक्षकार श्री. विकास विश्वास बोरसे, यांचे मालकीचा मौजे दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे येथील बिनशेती गट नं. ९६/६/७ पैकी प्लॉट नं. ४७ क्षेत्र ११५.३१ चौ. मी. सदरहू प्लॉटच्या चतु:सिमा महसुली रेकॉर्ड ऑफ राईट प्रमाणे हा प्लॉट आमचे पक्षकाराने श्री. आरीफ खान अमिन खान पठाण यांचे कडून विकत घेता आहे. श्री. आरीफ खान अमिन खान पठाण यांनी सदरहू प्लॉट मिळकत ही श्री. भगवान सिताराम बागुल यांचेकडून दि. २९/०२/२०१६ रोजी नोंदणीकृत खरेदीखताने विकत घैतलेला होता. सदरहू खरेदीखताचा नंबर दस्त क्र. ७६७/२०१६ असा आहे. सदरहू दस्त क्र. ७६७/२०१६ चे मुळ खरेदीखताचा दस्त आमचे पक्षकाराने श्री. आरीफ खान अमिन खान पठाण यांचेकडून घेतले होते. तो मुळ दस्त आमचे पक्षकार श्री. विकास विश्वास बोरसे यांचेकडून दि. २०/०७/२०२६ रोजी दोंडाईचा येथे बस स्टॅण्ड परिसरात हलवले आहे/ गहाळ झाले आहे.

तरी आमचे पक्षकार श्री. विकास विश्वास बोरसे, रा. कळंबू, ता. शहादा जि. नंदुरबार यांच्याकडून दि. २९/०२/२०१६ रोजीचे दस्त क्र. ७६७/२०१६ हे नोंदणीकृत खरेदीखत दोंडाईचा बस स्टॅण्ड परिसरात हरवले आहे/गहाळ झाले आहे. याबाब रितसर तक्रार आमचे पक्षकाराने दि. २८/०७/२०२६ रोजी स्पिड पोस्टाद्वारे दाखल केलेली आहे. म्हणून सदरहू खरेदीखत कोणासही सापडल्यास मिळून आल्यास अश्या लोकांनी सदरहू जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून०७ दिवसांच्या आत आमच्या पक्षकाराच्या वरनमूद पत्त्यावर अथवा आमच्या खालील पत्त्यावर संपर्क साधून परत करावे.

सदरहू नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सुचनेनुसार आमचे मार्फत प्रसिद्ध करण्यात आली असून.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे.
दि. २८/०७/२०२६

**ॲड. प्रमोद एस. मराठे.**
पत्ता : महादेवपुरा, दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे ४२५४०८ मो. ८६०५७३८७५६

## धुळे महानगरपालिका धुळे

जा.क्र./धुमपा/आस्था/५०५/२०२६
दि.२८/०७/२०२६

लाड व पागे समितीच्या शिफारशीनुसार खालील नमुद से.नि./मयत सफाई कामगारांचे वारसांना सफाई कामगार म्हणून नियुक्ती दयावयाची आहे.

| अ.क्र. | सफाई कर्मचाऱ्यांचे नाव | विहित वयोमानुसार सेवानिवृत्त | वारसदाराचे नाव | वारसाचे नाते | वारसाची जन्म तारीख | वारसाचे वय | वारसाचा जातीचा प्रवर्ग | वारसाची शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | श्री.समीर शब्बीर बेग | १२/५/२०२६ | श्री.अयान नवीद बेग | नामनिर्देशीत व्यक्ती | २२/७/२००७ | १८ | विमाप्र | ८ वी |
| २ | श्रीमती फरीदा हनीफ बेग | १२/०५/२०२६ | श्री. नदीम मुख्तार बेग | नामनिर्देशीत व्यक्ती | २/११/२००६ | १९ | विमाप्र | १० वी |
| ३ | श्रीमती अनुपमा राजेश चांगरे | २६/२/२०२६ | श्री.रोहीत राजेश चांगरे | मुलगा | १५/०२/१९९१ | ३५ | अनु. जाती | ११ वी |
| ४ | श्री.म.हनीफ शे. हसन | २८/०२/२०१५ | श्री.हासिम हुसेन म. हनिफ | मुलगा | ०३.०५.१९८९ | ३६ | मुस्लीम-खुला | १२ वी |

तरी सदर से.नि./मयत सफाई कामगार यांचे वारसदार यांचे बाबतीत काही कोणाची हरकत/सूचना असल्यास सदर यादी प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत निम्म स्वाक्षरी करणारे अधिकारी यांचेकडे लेखी स्वरुपात सादर करावे. तसेच मुदतीत कोणतही हरकत/सूचना प्राप्त न झाल्यास सदर से.नि/मयत सफाई कामगारांचे वारसांना नियुक्ती बाबत काही हरकत/सूचना नाही असे समजून वारसदार यांना नियुक्ती देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अति.आयुक्त
धुळे महानगरपालिका

## जाहीर नोटीस

नि..

### शिरपूर येथील मे.तहसिलदार सो. यांचे कोर्टात

अर्ज नं. /२०२६

**श्री. तुळशिराम देवराम तिरमले**
उ.व.५५,धंदा मजुरी रा.जातोडे ता.शिरपूर जि.धुळे ..अर्जदार

विरुद्ध

**ग्रामपंचायत अधिकारी सो.**
**ग्रामपंचायत वाडी खु. ता. शिरपूर जि. धुळे. ... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार तुळशिराम देवराम तिरमले यांचा जन्म दि. १५/०८/१९७१ रोजी मोजे वाडी खु. ता. शिरपूर जि. धुळे येथे झाला असून अर्जदार यास त्याचा जन्म दाखला मिळावा म्हणून जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे अर्ज दाखल करावयाचा आहे. अर्जदारास सदरचा जन्म दाखला शासकिय व निमशासकिय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांचा जन्मासंबंध कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ७ दिवसांच्या आत हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येईल.

दि. २८/७/२०६

**ॲड. महेश एस. वाघ**

## जाहीर नोटीस

नि..

### शिरपूर येथील मे.तहसिलदार सो. यांचे कोर्टात

अर्ज नं. /२०२६

**बेबाबाई अशोक बोराडे,** उ.व.४३, धंदा मजुरी
रा.जवखेडा पो. वारुळ ता. शिरपूर जि.धुळे ....अर्जदार

विरुद्ध

**ग्रामपंचायत अधिकारी सो.**
**ग्रामपंचायत जवखेडा ता. शिरपूर जि. धुळे. ... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदाराची नांत नामे माधवी राहुल शिरसाठ हिचा जन्म दि. १३/०६/२०२४ रोजी मौजे जवखेडा ता. शिरपूर जि. धुळे येथे झाला असून अर्जदाराला तिच्या नातचा जन्म दाखला मिळावा म्हणून जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे अर्ज दाखल करावयाचा आहे. अर्जदारास तिच्या नातचा जन्म दाखला शासकिय व निमशासकिय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार हिच्या नातच्या जन्मासंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ७ दिवसांच्या आत अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येईल.

दि. २८/७/२०२६

**ॲड. महेश एस. वाघ**

## जाहीर नोटीस

अर्जदार वकील
ॲड. एन. व्ही पवार

### शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. २३२/२०२६
नि. नं.६/ड

**१) श्री. राजधर झगा भिल, २) श्री. दगा झगा भिल, ३) श्री. गंभीर भगवान माळचे**
**४) श्री. लताबाई निंबा भिल, ५) छोटी धना भिल, ६) सरलाबाई गोपीचंद भिल**
**७) भिका धोडू भिल, ८) कला सुकलाल भिल, ९) मिनाबाई आबा भिल**
**१०)संगिताबाई गोकुळ भिल, ११)सुंदरबाई उखडू भिल, १२) दगुबाई बापू भिल**
**१३) सारक्षत्रजाबाई विठ्ठल भिल, सर्व रा. खलाणे ता. शिंदखेडा ... अर्जदार**

विरुद्ध

**कोणीही नाही** .... जाबदेणार
**कै. झगा धुलसिंग उर्फ फुलसिंग भिल मृत्यू दि. १८/१२/१९९३** ... मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. झगा धुलसिंग उर्फ फुलसिंग भिल हे दि. १८/१२/१९९३ रोजी मौजे खलाणे ता. शिंदखेडा जि. धुळे येथे मयत झालेले आहे. कै. झगा धुलसिंग उर्फ फुलसिंग भिल हे मयत झाल्यानंतर अर्जदार नं. १ राजधर झगा भिल अर्जदार नं. २ दगा झगा भिल हे मुले ह्या नात्याने अर्जदार नं. ३ गंभीर भगवान माळचे हा नातू ह्या नात्याने अर्जदार नं. ४ लताबाई निंबा भिल, अर्जदार नं. ५ छोटी धना भिल, अर्जदार नं. ६ सरला गोपीचंद भिल, अर्जदार नं. ८ कला सुकलाल पवार, अर्जदार नं. ९ मिनाबाई आबा भिल, अर्जदार नं. १० संगीताबाई गोकुळ भिल, अर्जदार नं. ११ सुंदरबाई उखडू भिल,अर्जदार नं. १२ दगुबाई बापू भिल ह्या नात ह्या नात्याने अर्जदार नं. १३ सारजाबाई विठ्ठल भिल ही मुलगी ह्या नात्याने अर्जदार नं. ७ भिका धोंडू भिल हा नातू ह्या नात्याने कायदेशीर वारस आहेत. याशिवाय त्यांना अन्य वारस नाहीत.असा कायदेशीर वारसांचा दाखला मिळण्याचा आदेश होणेस विनंती आहे. तसा कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी या मे.न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहू मयताला अजून कोणी वारस आहेत किंवा काय? किंवा अर्जदारांनी अर्जात नमूद केलेल्या व्यक्ती मयताचे वारस नाहीत. असे कोणाचेही काहीही म्हणने हरकत/तक्रार असल्यास त्यांनी दि. २७/८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मे. शिंदखेडा न्यायालयात स्वत: अगर वकील प्रतिनिधी मार्फत कागदपत्रासह हजर होवून लेखी हरकती नोंद्वाव्यात मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास अर्जाची एकतर्फा सुनावणी घेण्यात येवून अर्जदार मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा कायदेशीर वारसांचा दाखला देण्याविषयी पुढील योग्य तो आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे.

सदरहू जाहीर नोटीस मे.न्यायालयाचे आदेशावरुन प्रसिद्धीस आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात दिली असे. शिंदखेडा दि. १७/७/२०२६

सही...
**(कामगिरी कारकून)**
**दिवाणी न्यायालय शिंदखेडा**

कोर्टाचा शिक्का

सही...
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, शिंदखेडा**

## जाहीर नोटीस

नि. ६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्यु. डि. यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ६३५/२०२६

**१) सरलाबाई दिलीप भोई, २) गणेश दिलीप भोई,**
**३) सोनू दिलीप भोई, ४) पूनम दिलीप भोई**
वरील सर्व रा. क्रांतीनगर, शिरपूर ता.शिरपूर जि. धुळे... अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** ... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै.दिलीप यादव भोई, हे दि. २९/१२/२०१२ रोजी मौजे क्रांतीनगर, शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकिय व निमशासकिय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,वरील मयत व त्यांच्या वारसासंबंधीत कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. १९/८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. २७/०७/२०२६

सही...
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

कोर्टाचा शिक्का

सही...
**सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

दि.२७/०७/२०२६

तमाम लोकांना, सर्व वित्तीय संस्था, बँका ह्यांना गोविंद प्रकाश मराठे, रा. साई नगर, विरदेल रोड, शिंदखेडा जि. धुळे ह्यांनी दिलेल्या माहिती व सुचनेवरुन त्यांचे तर्फे व वतीने ॲड.विशाल बी. मराठे शिंदखेडा ह्यांचे कडून ह्या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे पाटण ता. शिंदखेडा जि. धुळे येथील भुमापन क्र. २०६/१, क्षेत्र ० हे. ८७, पो. ख. ० हे. ०६ आर. एकूणक्षेत्र ० हे. ९३ आर. आकारणी ४.८० पैसे ही शेत मिळकत रविंद्र दौलतराव पवार ह्यांच्या मालकीची आहे.रविंद्र दौलतराव पवार ह्यांनी सदरहू शेत मिळकतीचा कायम विक्री करण्याचा सौदा आमचे अशिल ह्यांचेशी केलेला असून तशी सौदापावती आमचे अशिलांचे हितामध्ये करुनदिलेली आहे. सदरच्या सौदा पावती नुसार आमचे अशिल लवकरच सदरहू शेतमिळकतीचे खरेदीखत लिहून व नोंदवून घेउन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

म्हणून ह्या जाहीर नोटीसीद्वारे आपणा सर्वांना कळविण्यात येते की, मौजे पाटण ता. शिंदखेडा जि. धुळे येथील भुमापन क्र. २०६/१, क्षेत्र ० हे. ८७, पो. ख. ० हे. ०६ आर एकूण क्षेत्र ० हे. ९३ आर, आकारणी ४.८० पैसे ह्या शेत मिळकतींवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, खावटीचा हक्क, अधिकार, हिस्सा, न्यायालयातील प्रलंबीत वाद,टांच, गहाण, जप्ती, सौदे करार, बोजा, न्यायालयाचा अथवा कोणत्याही अधिकाऱ्याचा सदरची मिळकत विक्रीस मनाई करणारा आदेश अथवा काही हितसंबंध असल्यास त्याबद्दलच्या तशा हरकती सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आमचे कडे कळवावी. जर सदरील मुदतीत कोणाच्याही काहीही हरकती न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतींचा खरेदीखत नोंदणी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेली माहिती वरुन व सुचनेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. दि. २७/०७/२०२७

**ॲड.विशाल बी. मराठे**
विरदेल रोड, शिंदखेडा जि. धुळे मो. ७०५७३८२७६५

## जाहीर नोटीस

दि.२७/०७/२०२६

तमाम लोकांना, सर्व वित्तीय संस्था, बँका ह्यांना इमरान शफी पठाण रा. चिमठाणे ता.शिंदखेडा जि. धुळे ह्यांनी दिलेल्या माहिती व सुचनेवरुन त्यांचे तर्फे व वतीने ॲड. विशाल बी. मराठे शिंदखेडा ह्यांचे कडून ह्या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे आच्छी ता. शिंदखेडा जि. धुळे येथील गट क्र. २८१/१, क्षेत्र २ हे ०० आर. आकारणी रु. १६.०० पैसे आणि आच्छी ता. शिंदखेडा जि. धुळे गट क्र. २८१/२ क्षेत्र २ हे. ६१ आर आकारणी रु. २१.१० पैसे ह्या शेत मिळकती कै. इब्राहिम गुलाब तांबेळी, अशपाक इब्राहिम तांबोळी ह्यांच्या मालकीची आहे. सदरहू शेत मिळकतींचा कायम विक्री करण्याचा तोंडी सौदा आमचे अशिल ह्यांचेशी केलेला आहे. सदरच्या तोंडी सौद्यानुसार आमचे अशिल लवकरच सदरहू शेतमिळकतीचे खरेदीखत लिहून व नोंदवून घेउन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

म्हणून ह्या जाहीर नोटीसीद्वारे आपणा सर्वांना कळविण्यात येते की, मौजे आच्छी ता. शिंदखेडा जि. धुळे येथील गट क्र. २८१/१, क्षेत्र २हे. ०० आर. आकारणी रु. १६.०० पैसे आच्छी ता. शिंदखेडा जि. धुळे येथील गट क्र. २८१/२, क्षेत्र २हे. ६१ आर. आकारणी रु. २१.१० पैसे ह्या शेत मिळकतींवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, खावटीचा हक्क, अधिकार, हिस्सा, न्यायालयातील प्रलंबीत वाद, टांच, गहाण, जप्ती, सौदे करार, बोजा, न्यायालयाचा अथवा कोणत्याही अधिकाऱ्याचा सदरची मिळकत विक्रीस मनाई करणारा आदेश अथवा काही हितसंबंध असल्यास त्याबद्दलच्या तशा हरकती सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आमचे कडे कळवावी. जर सदरील मुदतीत कोणाच्याही काहीही हरकती न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतींचा खरेदीखत नोंदणी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेली माहिती वरुन व सुचनेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. दि. २७/०७/२०२७

**ॲड.विशाल बी. मराठे**
विरदेल रोड, शिंदखेडा जि. धुळे मो. ७०५७३८२७६५

## जाहीर नोटीस

अर्जदार वकील
ॲड. एन. व्ही पवार

### शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. २३१/२०२६
नि. नं.६

**१) श्रीमती वैजंताबाई गुलाबराव पवार ,पाटील, २) श्री. विश्वासराव गुलाबराव पवार**
**अर्जदार नं. १ व २ रा. मु. पो. पाटण ता. शिंदखेडा जि. धुळे**
**३) सौ. शिला सुधिर पाटील, रा. मु. पो. विद्यानगरी देवपूर धुळे ता. जि. धुळे**
**४) सौ. छाया अरुण पाटील, रा.मु.पो.धुळे ता. जि.धुळे**
**५) सौ. विजयाबाई प्रकाश पाटील, रा. मु. पो. गणपूर ता. चोपडा जि. जळगांव**
**६) सौ. मालती पुरुषोत्तम पाटील, रा. मु. पो. मांडळ ता. अमळनेर जि.जळगांव ... अर्जदार**

विरुद्ध

**कोणीही नाही** .... जाबदेणार
**कै. गुलाबराव बाजीराव पाटील** मृत्यू दि. ०२/०४/२०२१ ... मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. गुलाबराव बाजीराव पाटील हे दि. ०२/०४/२०२१ रोजी मौजे पाटण ता. शिंदखेडा जि. धुळे येथे मयत झाले आहेत. कै. गुलाबराव बाजीराव पाटील हे मयत झाल्यानंतर अर्जदार नं. १ वैजंताबाई गुलाबराव पवार ही पत्नी ह्या नात्याने अर्जदार नं. २ विश्वासराव गुलाबराव पवार हा मुलगा ह्या नात्याने अर्जदार नं. ३ शिला सुधिर पाटील तसेच अर्जदार नं. ४ छाया अरुण पाटील अर्जदार नं. ५ विद्याबाई प्रकाश पाटील अर्जदार नं. ६ मालती पुरुषोत्तम पाटील ह्या मुली ह्या नात्याने कायदेशीर वारस आहेत. या शिवाय त्यांना अन्य वारस नाहीत असा कायदेशीर वारसांचा दाखला मिळण्याचा आदेश होणेस विनंती आहे. तसा कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी या मे.न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहू मयताला अजून कोणी वारस आहेत किंवा काय? किंवा अर्जदारांनी अर्जात नमूद केलेल्या व्यक्ती मयताचे वारस नाहीत. असे कोणाचेही काहीही म्हणने हरकत/तक्रार असल्यास त्यांनी दि. २९/८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मे. शिंदखेडा न्यायालयात स्वत: अगर वकील प्रतिनिधी मार्फत कागदपत्रासह हजर होवून लेखी हरकती नोंद्वाव्यात मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास अर्जाची एकतर्फा सुनावणी घेण्यात येवून अर्जदार मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा कायदेशीर वारसांचा दाखला देण्याविषयी पुढील योग्य तो आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे.

सदरहू जाहीर नोटीस मे.न्यायालयाचे आदेशावरुन प्रसिद्धीस आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात दिली असे. शिंदखेडा दि. १८/७/२०२६

सही...
**(कामगिरी कारकून)**
**दिवाणी न्यायालय शिंदखेडा**

कोर्टाचा शिक्का

सही...
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, शिंदखेडा**

## जाहीर नोटीस

ॲड. जितेंद्र पी. पाटील
शिरपूर जि. धुळे

### शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनि. डिव्ही. यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. २३७/२०२६
नि. नं.६ चौ. ता. ०२/०९/२०२६

**१) विकास दोधू सोनवणे (पाटील)** , रा. चिलाणे ता. शिरपूर जि. धुळे
ह. मु. ए/३३, महादेवनगर ४, डिंडोली, नवागाम सुरत जि. सुरत
**२) इरोपाबेन शंकरराव पाटील,** रा. ७८६, विशालनगर, तरसाली रोड, तरसाली, वडोदरा
**३) प्रतिभा हिरामण पाटील,** रा. बोरकुंड ता. जि. धुळे.
**४) वंदना दादाजी बच्छाव,**
रा. गल्ली नं. ४, इंदिरानगर, सोयगांव, ता. मालेगांव जि. नाशिक ... अर्जदार

विरुद्ध

**कोणीही नाही** .... जाबदेणार
**दोधू दिवान पाटील,** मयताचा पत्ता : चिलाणे ता. शिंदखेडा जि. धुळे
मृत्यू दि. १७/११/२०२१ ... मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ यांचे वडील नामे दोधू दिवान पाटील हे दि. १७/११/२०२१ रोजी मौजे डिंडोली जि. सुरत येथे मयत झालेले आहेत. मयतास अर्जदार नं. १ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज मे. न्यायालयात त्यांनी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदारांव्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी या मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. ०२/०९/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारां व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही. असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर शिरपूर यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

सही...
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय शिंदखेडा**

कोर्टाचा शिक्का

सही...
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, शिंदखेडा**

पान १ वरुन

## डॉ.गावीत कुटुंबियांवरील वक्तव्याच्या

अवमान करणारे असल्याचे तक्रारदारांनी म्हटले आहे. त्यामुळे संबंधितांवर ट्रॉसिटीसह लागू असलेल्या विविध कायदे कलम नुसार गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणामुळे सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता असून, सोशल मीडियावर अशा प्रकारचे आक्षेपार्ह साहित्य प्रसारित करणाऱ्यांचाही शोध घेऊन त्यांच्यावरही कारवाई करण्यात यावी, अशी मागणी माजी जि.प. सदस्य विजय ठाकरे माजी प.सं. सदस्य सुधीर आकलाडे , माजी प.सं. सभापती कविता क्षीरसागर, प्रदीप नांद्रे, उत्पल नांद्रे, सचिन देसले, मनोज देसले, सुजन सोनवणे, संतोष सोनवणे, धनराज गांगुर्डे, खंडू कुवर, कमलाकर मोहिते, गोविंदा सोनवणे, रंगा भवरे ,गणेश सूर्यवंशी, ईश्वर धनगर, विजय दही ते, दशरथ शेलार, स्वप्निल अकलाडे सागर बोरसे यांच्यासह शेकडो आदिवासी महिला पुरुष या मोर्चात सहभागी झाले होते.

सदर तक्रारीवर भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर योग्य ती कारवाई पोलीस निरीक्षक दीपक वळवी यांनी करावी अशी मागणी निवेदन देऊन करण्यात आली आहे.

## महाराष्ट्रासह सात राज्यांना सुप्रीमचे आदेश

याचिकांमध्ये करण्यात आलेले आरोप पाहता स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशीची आवश्यकता प्रथमदर्शनी दिसून येते. या प्रकरणी केंद्र सरकारसह आसाम, बिहार, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि केरळ सरकारांना नोटीस बजावून त्यांची भूमिका मागविण्यात आली आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक स्थापन करण्याचाही विचार केला जाऊ शकतो, असे खंडपीठाने सूचित केले. सुनावणी दरम्यान याचिकाकर्त्यांनी आंदोलनात इलेक्ट्रीक बॅटनचा वापर, पेलेट गनमुळे झालेल्या जखमा, वकिलांवरील हल्ले, सामान्य वेशातील पोलिसांकडून झालेला कथित हिंसाचार आणि एकोणावीस वर्षीय तरुणीला झालेल्या दुखापतीसह अनेक गंभीर आरोप न्यायालयासमोर मांडले. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश लक्षात घेऊन मुख्यमंत्री फडणीस यांनी गृह खात्याच्या वरिष्ठांना सुचना केल्या आहेत. आंदोलन दरम्यान अटक केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी विनाविलंब सुटका करावी, असे निर्देश दिले आहेत.

## शेतकऱ्याचे पन्नास हजार लुटले; एकाला अटक

रा. कुडिया, जि. रोजगड, म.प्रदेश) याच्यासह तिघांनी त्यांचा रस्ता अडविला. त्यापैकी एकाने चाकूचा धाक दाखवून त्यांच्या हातातील पैशांची पिशवी हिसकावून पळ काढला.

या प्रकरणी जितेंद्र दहिते यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार निजामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी संशयित किरीष सिसोदिया यास अटक केली असून इतर दोघांचा शोध सुरू आहे.

## शेतकऱ्यांनी आधार बायोमेट्रिक प्रमाणीकरण

प्रमाणीकरण पूर्ण केल्यास कर्जमाफीची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. त्यामुळे उर्वरित सर्व पात्र शेतकऱ्यांनी विलंब न करता आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मनोज चौधरी यांनी केले आहे.

## नागपूरात पावसामुळे मुले शाळेत अडकले

घेऊन अग्निशमन दलाच्या जवानांनी स्थानिक नागरिक आणि पालकांच्या मदतीने बचावकार्य सुरू केले. शाळेच्या इमारतीपासून मुख्य रस्त्यापर्यंत दोरीच्या सहाय्याने मानवी साखळी तयार करण्यात आली. या माध्यमातून पहिली ते दहावीतील विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे पाण्यातून बाहेर काढण्यात आले. बचावकार्य दरम्यान पालकांनीही मोठी मदत केली.

दरम्यान, शाळेसमोरील रस्त्याचे काम सुरू असल्याने आणि अपूर्ण कामामुळे पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. पावसाळ्यात योग्य नियोजन न केल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याची नाराजी पालकांनी व्यक्त केली. अग्निशमन दल आणि नागरिकांच्या प्रयत्नांमुळे मोठी दुर्घटना टळली. सर्व विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे पालकांच्या स्वाधीन करण्यात आले असून, परिसरातील पाण्याचा निचरा करण्याचे काम प्रशासनाकडून सुरू करण्यात आले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज स्मारक उभारणीबद्दल

सांगितले की, मला छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक बनविण्याचे भाग्य लाभले याबद्दल मी संपूर्ण धुळे शहर वासियांचे आभार मानतो. माझ्या पाठीशी आपण नागरीकांनी कायम असेच उभे रहावे व माझ्या चांगल्या कामांना नेहमी सहकार्य करावे. धुळे शहरातील शिवस्मारक हे विरोधामुळे प्रलंबित पडले ही अत्यंत खेदाची बाब आहे. यामुळे धुळे शहराचे नाव खराब झाले आहे. तरी विरोधकांनी देखील चुकीच्या गोष्टींना विरोध करावा परंतु शहराच्या विकासाला विरोध करू नये. तसेच भविष्यात देखील धुळे शहरात विकासाचे कार्य असेच सुरु राहील अशीही ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी आ.अग्रवाल यांचेसह सकल मराठा समाज, धुळे जिल्हा चे सुधाकर बेंद्रे, भानुदास बगदे, विनोद जगताप, साहेबराव देसाई, राजेंद्र काळे, नगरसेवक राजेश पवार, योगीराज मराठे, मनोज ढवळे, रणजीत भोसले, दिपक रौंदळ, प्रफुल्ल पाटील, उल्हास यादव, संतोष जाधव, मालुसरे साहेब, प्रभाकर वाघ, वामन मोहिते, सुरेश पवार, भैय्या जिवरक, सुनिल ठाणगे, श्याम रायगुडे, मनोहर जाधव, श्याम निरगुडे, संतोष लकडे, उल्हास पाटील, गोविंद वाघ, नरेंद्र मोदी, सुनिल वर्पे, दिनेश काळे, विठ्ठल गावडे, बाळासाहेब ठोंबरे, श्रीराम जाधव, विजय चव्हाण, उज्जल वाकळे, राजेंद्र इंगळे, संजय बगदे, अशोक बाबर, देवकर दादा, मधु जाधव, शशी गायकवाड, नैनेश साळुंखे, बंडू पवार, शुभम भोसले, हेमंत चव्हाण, रजनीश निंबाळकर, वैभव पाटील, राजू पाटील, विक्रमसिंग काळे, देवा पवार, विलास ढवळे, अमोल मराठे, प्रा. भरत काळे, राजेश चव्हाण, प्रेमकुमार अहिरे, बाळासाहेब जाधव, अमित भोसले, सागर बेंद्रे, राजेंद्र सरोदे, दिलीप पाटील, सुनिल पाटील, गजानन गायकवाड, राहुल गायकवाड, अविनाश बहादुरके, अमर फरताडे, गोकुळ पाटील, संदिप पवार यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

## पांडव नगरात घरफोडी दागिने, रोकड लंपास

त्यानंतर घरातील कपाट फोडून सुमारे साडेबारा ग्रॅम वजनाची सोन्याची पोत, तीन ग्रॅमची सोन्याची अंगठी, सुमारे पाच भार वजनाच्या चांदीच्या साखळ्या तसेच पन्नास ते साठ हजारांची रोकड असा मुद्देमाल चोरून नेला.


घटनेची माहिती मिळताच धुळे तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पथक, श्वानपथक तसेच ठसेतज्ज्ञांनी घटनास्थळी पाहणी करून पुरावे संकलित केले. या पथकात पीएसआय धनंजय मोरे, वाहन चालक हेड कॉन्स्टेबल प्रकाश भावसार आणि इतर कर्मचाऱ्यांचा समावेश होता. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात सायंकाळी उशिरापर्यंत फिर्याद देण्याचे काम सुरू होते.

## बेटावदला आयडीया कं.चे नेटवर्क मिळत नाही

विद्यार्थी या सर्व नागरिकांना मोठा फटका बसत असल्यामुळे महत्त्वाचे फोन कॉल बँकिंग व्यवहार शासकीय कामे आणि डिजिटल सेवा यावर परिणाम होत आहे त्यामुळे ग्राहकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे वारंवार तक्रार करूनही अद्याप कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आले नसल्यामुळे ग्राहकांनी नाराजीच्या सूर व्यक्त केला आहे तसेच संबंधित कंपनीने तातडीने नेटवर्कची समस्या दूर करून अखंड सेवा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी बेटावद व परिसरातील ग्राहकांकडून होत आहे

# एसआयआर प्रक्रिया केली नाही तर योजनांचा लाभ नाही; मंत्री बावनकुळे

मुंबई, दि. २८ (प्रतिनिधी) : विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) प्रक्रियेबाबत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेल्या विधानामुळे राज्यात चर्चेला उधाण आले आहे. एसआयआर प्रक्रिया पूर्ण केली नाही तर विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येऊ शकतात, असे त्यांनी एका कार्यक्रमात सांगितले. राज्यात तीस जूनपासून मतदार यादीच्या विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. या प्रक्रियेद्वारे मतदार यादीतील नाव, पत्ता व इतर तपशील अद्ययावत केले जात असून, स्थलांतरित किंवा चुकीच्या नोंदी दुरुस्त करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.




यासंदर्भात बोलताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सतरा ऑगस्ट २०२६ पर्यंत एसआयआर पूर्ण करणे आवश्यक असल्याचे सांगितले. जुन्या मतदार याद्या रद्द होऊन नवीन यादी तयार केली जात असल्याने प्रत्येक पात्र नागरिकाने या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. मतदार यादीत नाव नसल्यास विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात, असेही त्यांनी नमूद केले. भविष्यात आधार आणि मतदार ओळखपत्राशी संबंधित प्रक्रियांमध्ये परस्पर समन्वय वाढण्याची शक्यता असल्याचा उल्लेखही त्यांनी केला. दरम्यान, बावनकुळे यांच्या विधानानंतर विविध स्तरांतून प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. भविष्यात अठरा वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांची नोंदणी, उच्च शिक्षणासाठी किंवा नोकरीनिमित्त परदेशात असलेल्या नागरिकांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्याची प्रक्रिया कशी राहील, याबाबत अधिकृत स्पष्टीकरण देण्याची मागणी व्यक्त होत आहे. एसआयआर प्रक्रियेबाबत मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित निवडणूक प्राधिकरणाने स्पष्ट मार्गदर्शक सूचना जाहीर कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## भारत विकास परिषद वृक्षारोपण उत्साहात

धुळे, दि.२८- राष्ट्रीय स्तरावर सेवाभावी संस्था म्हणून कार्यरत असलेल्या भारत विकास परिषदेच्या धुळे शाखे तर्फे सेवा पंधरवड्यात पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी मौजे सटवाड पावनता मारूती मंदीर लळींग कुरण परिसर येथे वृक्षारोपण करण्यात आले.

या प्रसंगी अध्यक्ष विजयसिंह सिसोदिया, सचिव विनीत जैन, प्रांत सचिव राजेंद्र जाखडी, प्रांत संपर्क संघटन सचिव राजेश वाणी, उपाध्यक्ष दीपक जैन, पर्यावरण आयाम व प्रकल्प प्रमुख मोहन चित्ते, संपर्क प्रमुख मनोज जैन, राजेंद्र वर्मा, डॉ धनंजय शुक्ला, डॉ सौ प्राची शुक्ला ,डॉ संजय खोपडे, अनिल भडागे व सहकारी उपस्थित होते.

## पटेल सी.बी.एस.ई स्कूलचे एकादशी निमित्त कार्यक्रम

शिरपूर, दि.२८- शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित वाघाडी ता. शिरपूर येथील जयश्रीबेन अमरीशभाई पटेल सी.बी.एस. ई स्कूलमध्ये आषाढी एकादशी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विठ्ठलाच्या भक्तिमय ओढीच्या भावनेने स्कूल मध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध भक्तिमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व विठ्ठलाच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली शाळेच्या प्राचार्या मेघा मुंगसे यांच्या हस्ते पूजन झाले. त्यानंतर शाळेच्या परिसरात दिंडी काढण्यात आली. दिंडीत टाळ आणि चिपळ्यांच्या तालावर विद्यार्थ्यांनी विठ्ठल नामाचा जयघोष केला. इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनींनी भक्ती




गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आषाढी एकादशी बद्दल माहिती शिक्षिका सुचिता जैन यांनी दिली.

शाळेचे वातावरण अगदी विठूमय होऊन गेले होते. आभार सुवर्णा पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्न केले.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

पान १ वरुन

## तीन हजार नऊशे चार किलो गांजा प्रकरणातील

यांच्यासह पोलिस शिपाई योगेश जगताप, रामराज जयराम वंजारी वजनकाटाधारक पो.ना. नितीन मोहने, प्रविण मोरे, लघु न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा धुळे, सहायक पो.नि. अभिषेक पाटील, पोसई दिपक वारे, पोलिस हवालदार मोरे, पो. ना. संतोष देवरे, पो.ना. कुंदन पवार, पो.शि. आरीफ पठाण, चालक पो. ना. सैयद शेख असे लाकडया हनुमान गावाकडे रवाना झाले. लाकडया हनुमान गावाच्या कच्च्या रोडने लाकडया हनुमान शिवारातील मांगीलाल पावरा याच्या शेतावर १५.२० वाजता पोलिस पथक पोहोचले त्यावेळी पोलिसांनी मांगीलाल पावरा यास पाहून मांगीलाल थांब थांब असा आवाज दिला परंतु मांगीलाल हा पळत सुटला त्यानंतर पोलिसांनी शेताची बारकाईने पाहणी केली असता चाऱ्याच्या कडब्याच्या ढिगारेखाली काळ्या रंगाच्या प्लॉस्टीकच्या कागदाखाली प्लास्टीकच्या गोण्यांमध्ये व पत्रटी गोठयांमध्ये हिरवट रंगाच्या पानबिया काडयांचा चुर्रा असलेला अर्धवट सुकलेला गांजा दिसून आला सदरचा गांजा जमिनीवर पान टाकून खाली ओतला व तो गांजा पांढऱ्या रंगाच्या गोण्यांमध्ये भरला व प्रत्येक गोणीमध्ये ३०.५०० किलो असे एकूण १२८ गोण्यांमध्ये ३९०४ किलो गांजा मिळून आला त्यातून रासायिक प्रयोगशाळेसाठी सॅम्पल काढून त्याप्रमाणे जप्ती पंचनामा उमेश शामराव बोरसे, सहा. पो.नि. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा धुळे यांनी केला व सदरील छापा टाकतेवेळी पो.अधिक्षक चिन्मय पंडीत, राजू भुजबळ अप्पर पो. अधिक्षक व मा.पो.नि. शिवाजी बुधवंत स्थनिक गुन्हे अन्वेषण शाखा हे प्रत्यक्ष छापा टाकतेवेळी हजर होते. त्याबाबत त्यांचे छापा टाकतेवेळीचे हजर असल्याचे फोटो देखील तपास कामात तपास अधिकारी यांनी दोषारोपपत्रासोबत दाखल केलेले आहे तसेच सदर केसचा संपुर्ण तपास सहा. पो.नि. अभिषेक दिलीप पाटील यांनी व पो.नि. सुरेश भिकाभाउ शिरसाठ यांनी केलेला आहे.

सदर केस कामात सरकारपक्षा तर्फे खालीलप्रमाणे साक्षीदार तपासण्यात आले. आत्माराम संभू वाघ, सरकारी जप्ती पंचनामा पंच उमेश शामराव बोरसे, फिर्यादी व जप्ती पंचनामा तयार करणारे अधिकारी सुनिल गजानन विंचूरकर, छापा पथक, पो. कॉन्स्टेबल, जयेश प्रविण धाकड, इन्व्हेंटरी पंचनामा पंच, योगेश दिलीप जगताप, छापा पथक, पो. कॉन्स्टेबल, रामदास जयराम वंजारी, वजनकाटाधारक व वजनमाप करणारा इसम, सुबाराम नंदलाल पावरा, अटक पंच, प्रशांत विजय माळे, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा फोटोग्राफर, संतोष भगवान देवरे, छापा पथक, पो. कॉन्स्टेबल, रविन आखाड्या पावरा, गांजा वाहणारा मजूर, प्रविण वाल्मिक मोरे, लघु न्याय सहा. वैज्ञानिक प्रयोगशाळा धुळे, स.पो. नि. अभिषेक दिलीप पाटील, गुन्हयाचे तपास अधिकारी, पो.नि. सुरेश भिकाभाऊ शिरसाठ, गुन्हयाचे तपास अधिकारी इ. साक्षीदारांची साक्ष सदर केस कामात झाली परंतु आरोपीतर्फे बचाव पुरावा म्हणजे साक्षीदार यांच्या साक्षीतील विसंगती, त्रुटी, पंचनामा तयार करणारे पंच हे पोलिस अधिक्षक कार्यालयाचे कर्मचारी तसेच एनडीपीएस ॲक्ट १९८५ च्या महत्वाच्या तरतुदींचे पालन नाही तसेच पोलिस अधिक्षक व अप्पर पोलिस अधिक्षक व पोलिस निरिक्षक स्थानिक गुन्हे अन्वेषण धुळे यांच्या सहया पंचनाम्यावर नाही त्याचप्रमाणे पोलिस अधिक्षक व अप्पर पोलिस अधिक्षक व पोलिस निरिक्षक स्थानिक गुन्हे अन्वेषण धुळे यांना गुन्हयाकामी साक्षीदार म्हणून तपासले नाही त्याचप्रमाणे बचाव पक्षाकडून सर्वोच्च न्यायालयाचे व उच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे देण्यात आले व आरोपींचा बचाव मे. कोर्टाने मान्य करुन आरोपी मांगीलाल बारकू पावरा याची ३९०४ किलो गांजा बाळगल्याच्या निर्दोष मुक्तता केली आहे.

## सतरा तोळे दागिने घेवून फसवणूक

अंगठ्या, ०.५ तोळा वेले, ०.५ तोळा सुई-दोरा कानातले, ०.५ तोळा लेडीज अंगठी आणि ४ तोळे जेन्ट्स ब्रेसलेट असा एकूण १७ तोळे सोन्याचा ऐवज असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात तिन्ही आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अनिल गोसावी करीत आहेत. पोलीस निरीक्षक अमोल सातोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## होमिओपॅथीला महा. मेडिकल कौन्सिलची

संघटनांनी स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र शासनाने रुग्णहित, वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता आणि विद्यमान कायदेशीर तरतुदी यांचा सर्वंकष विचार करून अशा कोणत्याही हालचालींचा तातडीने पुनर्विचार करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. आंदोलनाचा सविस्तर कार्यक्रम आणि पुढील कृती लवकरच जाहीर करण्यात येईल.अशी माहिती अध्यक्ष डॉ. पराग उपकारे, कार्याध्यक्ष डॉ. सचिन जैन, सचिव डॉ. विशाल पाटील यांनी दिली आहे.

## पूर्व-वैमनस्यातून देवपूरात मारहाण

मंगलपोत हिसकावून घेतली. घरात डब्यात ठेवलेली दहा हजारांची रोकड घेऊन ते पसार झाले. या प्रकरणी देवपूर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाला.


**स्मरणपुष्प**


३६ वे पुण्यस्मरण | २९ वे पुण्यस्मरण



स्व.कुंदनमलजी प्रेमसुखजी पाटणी
(स्वर्गवास-मंगळवार-गुरूपौर्णिमा १९८९)

स्व.श्रीमती कस्तुराबाई कुंदनमलजी पाटणी
(स्वर्गवास-मंगळवार-गुरूपौर्णिमा १९९६)

- नतमस्तक -
संतोष कुंदनमल जैन (पाटणी)
कार्तिक संतोष जैन (पाटणी)
स्वप्नेश अनिल जैन (पाटणी) विनोद हुकूमचंद जैन (पाटणी)
सुहास अनिल जैन (पाटणी) पारस हुकूमचंद जैन (पाटणी)
मानस विनोद जैन (पाटणी) अर्चित विनोद जैन (पाटणी)
मनुश्री पारस जैन (पाटणी) तेजल पारस जैन (पाटणी)
रिदम स्वप्नेश जैन (पाटणी)
पाटणी परीवार,'शशिराज', शांतीनाथ नगर साक्रीरोड, धुळे.




**घर भाड्याने देणे**
१४, भिवसन नगर, वाडीभोकर रोड, देवपूर धुळे
-: संपर्क :-
9765009230

**पाहिजेत**
ऑफिस असिस्टंट पाहिजेत
शिक्षण योग्यता कॉम्प्युटर ज्ञानानुसार पगार दिला जाईल.
-: संपर्क :-
वानखेडे
7843078387

**पाहिजेत**
१) बॅनर मशीन ऑपरेटर पाहिजे.
२) हेल्पर पाहिजे.
सुयोग डिजीटल प्रिंटर्स
श्रीराम कॉम्प्लेक्स, पॉवर हाऊसजवळ, साक्रीरोड, धुळे.
मो.8087524209

**WANTED**
Experienced Pharmacist
Minimum 1 year Experience
Contact
8788637592

**पाहिजेत**
अकाऊंटच्या कामासाठी हुशार व अनुभवी मुलगा किंवा मुलगी पाहिजे.
Tally Oprat करता यायला पाहिजे.
साईबाबा रेडीमेड ॲण्ड होजीअरी
गल्ली नं.२, मुल्लाबाडा रोड अकबर चौक, धुळे
9422286958
7350148955

**पाहिजेत**
टायपिस्ट म्हणून मुलगा/ मुलगी पाहिजेत. इच्छुकांनी सायंकाळी ६ वाजता समक्ष भेटावे.
अनुभवी व्यक्तीस प्राधान्य
श्रीविनायक डायग्नोस्टीक सेंटर
हॉटेल गणपती पॅलेस समोर, मालेगाव रोड, धुळे

**भाड्याने देणे आहे**
MIDC अवधान येथील सर्व सोयीयुक्त कमर्शियल जागा ५५० स्के.फुट गाळे सहित, गृह उद्योगासाठी, लघुउद्योगासाठी, ऑफिससाठी, गोडाउनसाठी, राहण्यासाठी, करारानुसार भाड्याने देणे आहे.
: संपर्क:
8446456416

**पाहिजेत**
धुळे जिल्ह्यात समर्थ होम अप्लायन्स कंपनीला कामासाठी मुले, स्त्री, पुरुष व ड्रायव्हर त्वरीत भरती आहे, शिक्षणाची अट व वयाची अट नाही.
पगार : १५००० ते २००००
: संपर्क :
मो.7447422022
9021776720

**पाहिजेत**
विकास दुध पाऊच पॅकींग वाटपसाठी मुले पार्टटाईम पाहिजेत.
समक्ष भेटा- स.११ ते १२
विकास दुध, नवग्रही ग.न.२, उषा ड्रेसेस समोर, पारोळा रोड, धुळे
9890030422
8600773021

**पाहिजेत**
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**पाहिजेत**
दुकान कामासाठी मुले/मुली पाहिजेत.
राम ड्रेसेस
महात्मा गांधी पुतळ्याजवळ, धुळे

**आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...**

atomberg "Why not?"





क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॅट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॅट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरुरत नहीं होती है !
SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०